दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २९४ I शुक्रवार ७ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## मैत्रिणीशी बोलण्याच्या वादातून तरुणावर चाकूहल्ला

**अहिल्यानगर :** शहरात पुन्हा एकदा गुन्हेगारी डोके वर काढत असल्याचे चित्र समोर आले आहे. तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नगरी व्हिलेज आणि बंधन लॉन परिसरात एका मैत्रिणीशी बोलत असल्याच्या रागातून तरुणावर चाकू व लोखंडी वस्तूने खुनी हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेत दोन तरुण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत तोफखाना पोलिसांनी पाच अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, सिद्धार्थ नगर येथील रहिवासी रोहित सुरेश शिंदे (वय २४) हा तरुण आपल्या एका मैत्रिणीसोबत नगरी व्हिलेजजवळ उभा असताना दोन अनोळखी मुलांनी त्याच्याशी विनाकारण वाद घातला. फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात पाच अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक फौजदार रमेश थोरवे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# मराठ्यांचे ‘पानिपत’ करण्याचा सरकारचा कट

### कुणबी जातवैधता रद्द प्रकरणावरून जरांगे पाटील यांचा मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे आणि बावनकुळे यांच्यावर थेट हल्लाबोल; सरकारवर नियोजनबद्ध कारस्थानाचा आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात कुणबी जातीची प्रमाणपत्रे मिळालेल्या चार मराठा महिला लोकप्रतिनिधींची जातवैधता प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीने रद्द केल्यानंतर मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर गंभीर आरोप करत सरकारवर तीव्र टीका केली. सरकारनेच कुणबी प्रमाणपत्रे देऊन आता तीच रद्द करण्याचा नियोजनबद्ध कट रचल्याचा आरोप करत, मराठ्यांचे पानिपत करण्याचा प्रयत्न सुरू असून २०२९ मध्ये युतीला असा धडा शिकवू की, कांड्यावर म ोजण्याइतकेही आमदार निवडून येणार नाहीत, असा इशारा त्यांनी दिला. जरांगे पाटील **(पान ४ वर)**



#### सरकारचा हस्तक्षेप नाही



प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडे जातात तेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अंतर्गत काम केले जाते. यामध्ये राज्य सरकारचा कुठलाही हस्तक्षेप नाही. जात पडताळणी समिती सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसारच काम करते. आता कुणबी प्रमाणपत्र किती रद्द केली, याची मला माहिती नाही. पण मी सांगू शकतो की, मोठ्याप्रमाणात त्यांच्याकडे वेगवेगळी प्रमाणपत्रात येतात, त्यामध्ये १०-१२ टक्के रिजेक्शन रेट आहेच त्यांचा. त्यांच्याकडे जी नॉन कुणबी ओबीसी प्रमाणपत्र येतात त्यामध्येही १० टक्के काहीवेळा २५ टक्के रिजेक्ट होतात. त्यामुळे जाणीवपूर्वक ते कोणी रिजेक्ट करत आहे, असे होत नाही. तरीही यासंदर्भात कोणाचा काही आक्षेप असेल तर तो बघितला जाईल. जे काही वरिष्ठ अधिकारी असतील ते यामध्ये लक्ष घालतील. योग्य प्रक्रिया पूर्ण केली आहे की नाही, हे आपल्याला बघता येते. यामध्ये अपीलही करणे शक्य आहे. आम्ही सत्तेत आहोत. पण भाजपच्याही अनेक जिल्हा परिषद आणि नगरसेवकांची प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने रद्द केली आहेत. यामध्ये कुठलाही राजकीय हस्तक्षेप नसतो. - **देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

#### नार्को टेस्ट कराच



महसूलमंत्री बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यास सांगितले असून त्यांची नार्को टेस्ट करावी, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली होती. या आरोपांवर आता चंद्रशेखर बावनकुळे यांनी पहिल्यांदाच सविस्तर प्रतिक्रिया दिली असून आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचा दावा केला आहे. बावनकुळे म्हणाले की, माझी नार्को टेस्ट करायला परवानगी आहे. मला त्याची अडचण नाही. आम्हाला जात पडताळणी विभागात हस्तक्षेप करता येत नाही. बावनकुळे फोन करतात, मंत्री फोन करतात, जात पडताळणी विभागावर दबाव आणतात, यात काहीच तथ्य नाही. महसूल मंत्री म्हणून मीसुद्धा फोन करू शकत नाही. जात पडताळणी विभागाने एका ठिकाणी आक्षेप घेतला असेल, तर संबंधितांना उच्च न्यायालयात जाता येईल.

## इंडिकेटर न देता वळलेल्या कारने घेतले दोन जीव

### खरवंडी शिवारातील भीषण अपघात;उपचारादरम्यान दोघांचा मृत्यू

#### अज्ञात कारचालक फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील खरवंडी शिवारात घडलेल्या एका भीषण अपघाताने दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

रात्रीच्या अंधारात भरधाव वेगाने जाणाऱ्या एका स्वीफ्ट कारने कोणताही इंडिकेटर न देता अचानक वळण घेतल्याने मागून येणाऱ्या दुचाकीची कारवर जोरदार धडक बसली. या भीषण अपघातात दुचाकीवरील रवींद्र रमेश मिरपगार (वय ३९) आणि सचिन सुरेश मिरपगार (वय ३३, रा. मिरी, ता. पाथर्डी) हे गंभीर जखमी झाले. उपचारासाठी त्यांना नेवासा ग्राम ीण रुग्णालयात आणि त्यानंतर जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान दोघांचाही मृत्यू झाला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास अहिल्यानगर–नेवासा मार्गावरील खरवंडी शिवारातील सीपीएफ कंपनीजवळ हा अपघात घडला. एमएच-४६-सीएल-५४८२ क्रमांकाच्या स्वीफ्ट कारच्या अज्ञात चालकाने कोणताही इशारा न देता अचानक वाहन वळवल्याने मागून येणाऱ्या दुचाकीला धडक टाळता आली नाही. अपघातानंतर कारचालक घटनास्थळावरून पसार झाला.

या प्रकरणी नागेश संभाजी खोमणे यांच्या फिर्यादीवरून शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०६(१), २८१, १२५, ३२४(३) तसेच मोटार वाहन **(पान ४ वर)**

#### एका निष्काळजी क्षणाची दोन कुटुंबांना शिक्षा

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, कारचालकाने इंडिकेटर न देता अचानक वाहन वळवल्यामुळे हा भीषण अपघात घडला. एका क्षणाच्या निष्काळजीपणामुळे दोन तरुणांचे जीव गेले आणि दोन कुटुंबांचा आधार कायमचा हिरावला गेला. या घटनेनंतर महाम ार्गावरील बेदरकार वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची म ागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

## विमान तिकीट व्यवसायात मोठ्या नफ्याचे आमिष

### ४३ लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** विमानाच्या तिकिटांच्या व्यवसायात मोठा परतावा आणि नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची तब्बल ४३ लाख ४३ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार अहिल्यानगर शहरात समोर आला आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, इंद्रप्रस्थ कॉलनी, नागरदेवळे येथील रहिवासी आदेश लुमाजी चेमटे (वय ३४) यांना आरोपी अजयकुमार बाळासाहेब जगताप (रा. भिस्तबाग, अहिल्यानगर) याने विश्वासात घेतले. ’लिओ हॉलिडेज’ नावाच्या कंपनीद्वारे विमानाची तिकिटे खरेदी करण्याच्या व्यवसायात गुंतवणूक केल्यास खात्रीशीर परतावा आणि मोठा नफा मिळेल, असे आमिष आरोपीने दिले.

या आमिषाला बळी पडत फिर्यादी आदेश चेमटे यांनी १८ जुलै ते ४ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत बुऱ्हाणनगर आणि गुलमोहर रोड परिसरात आरोपीला वेळोवेळी रोख स्वरूपात आणि धनादेशाद्वारे एकूण ९८ लाख रुपये दिले. त्यानंतर आरोपी अजयकुमार जगताप याने त्यापैकी ५४ लाख ५७ हजार रुपये परत केले. मात्र, उर्वरित ४३ लाख ४३ हजार रुपये परत न करता फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली.

**■ सतत पाठपुरावा करूनही पैसे परत न मिळाल्याने फिर्यादीने पोलिसांत अर्ज दिला होता. पोलीस अर्जाच्या चौकशीत फसवणुकीचा प्रकार स्पष्ट झाल्यानंतर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आरोपी अजयकुमार जगताप याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड करत आहेत.**

## देशात येणार बायोगॅस क्रांती

### ‘गोवर्धन’ योजनेला ₹२३,७३१ कोटींची मंजुरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**नवी दिल्ली :** देशातील जैविक कचऱ्याचे इंधनात रूपांतर करून ऊर्जा स्वावलंबनाकडे मोठे पाऊल टाकत केंद्र सरकारने गुरुवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ₹२३,७३१ कोटींच्या ’गोवर्धन’ राष्ट्रीय योजनेला मंजुरी दिली. २०२६-२७ ते २०३५-३६ या दहा वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या योजनेमुळे देशातील कंप्रेस्ड बायोगॅस ( सीबीजी ) उत्पादनात सुमारे दहापट वाढ करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

शेण, पिकांचे अवशेष, शहरांतील जैविक कचरा आणि इतर सेंद्रिय पदार्थांपासून बायोगॅस निर्मिती करून स्वच्छ ऊर्जा उपलब्ध करून देण्याबरोबरच शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा नवा स्रोत उपलब्ध होणार आहे. शेतीतील अवशेष आणि शेण बायोगॅस प्रकल्पांना विकता येणार असल्याने पराली जाळण्याचे प्रमाण कमी होऊन प्रदूषणालाही आळा बसण्याची अपेक्षा आहे. या योजनेमुळे देशभरात मोठ्या प्रमाणावर नवीन बायोगॅस प्रकल्प उभारले जाणार असून खासगी गुंतवणुकीलाही चालना मिळणार आहे. कचरा संकलन, वाहतूक, प्रक्रिया आणि गॅस उत्पादनाशी संबंधित उद्योगांमुळे ग्राम ीण भागात रोजगारनिर्मितीला मोठी गती मिळणार आहे. ’कचऱ्यातून इंधन आणि शेतकऱ्यांसाठी उत्पन्न’ या संकल्पनेवर आधारित **(पान ४ वर)**

## पंतप्रधान मोदींच्या विदेश दौऱ्यावर ७५ कोटींचा खर्च

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** पंतप्रधान मोदींच्या वेगवेगळ्या परदेश दौऱ्यांवर केंद्र सरकारने या वर्षी आतापर्यंत तब्बल ७५ कोटी रुपये खर्च केले आहेत. तसेच २०२१ ते जुलै २०२६ पर्यंत ५५७ कोटी रुपये खर्च केले आहेत, अशी माहिती सरकारने गुरुवारी राज्यसभेत दिली आहे.



आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह आणि सीपीआयचे खासदार व्ही.शिवदासन यांनी पंतप्रधान मोदींच्या परदेश दौऱ्यांवरील खर्चाबाबत राज्यसभेत प्रश्न विचारला. या प्रश्नाला लेखी उत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाने मोदींच्या परदेश दौऱ्यांवरील खर्चाबाबत सविस्तर माहिती सांगितली. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, या वर्षी जुलैपर्यंत पंतप्रधान मोदींच्या परदेश दौऱ्यांवर एकूण ७४,५८,९३,७९७ रुपये खर्च झाले आहेत. गेल्या काही दिवसांत पंतप्रधान मोदींनी भेटी दिलेल्या देशांमध्ये मलेशिया, इस्रायल, संयुक्त अरब अमिराती, नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे, इटली, फ्रान्स, स्लोव्हाकिया, सेशेल्स, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या देशांचा समावेश आहे.

## फुले महाविद्यालयात प्राचार्यांवर लाचखोरीचा गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जालना :** येथील महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य, अधीक्षक, लिपीक, शिपाई आणि ग्रंथपाल यांना दीड लाखांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. सेवानिवृत्त प्रबंधकाला कालबद्ध पदोन्नतीचा लाभ आणि भविष्य निर्वाह निधी अर्थात जीपीएफची रक्कम मिळवून देण्यासाठी एक लाख पन्नास हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने ही कारवाई केली आहे.



तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीकडून सापळा रचण्यात आला आणि कॉलेज मध्येच लाचेची रक्कम स्वीकारताच महाविद्यालयाचे प्राचार्य राहुल हिवराळे, अधीक्षक बबन राठोड यांच्या सह पाचही जणांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईमुळे जालना शहरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कर सुधारणा विधेयक लोकसभेत मंजूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** जंतरमंतरवरील आंदोलनात सहभागी झालेल्या तरुणांवरील लाठीमाराची घटना, अमित शहांनी सभागृहात येण्याची विरोधकांची आग्रही मागणी आणि इतर मुद्द्यांवर विरोधकांनी सरकारला घेरले असतानाच आणि प्रचंड गदारोळामुळं कामकाजाला काही प्रमाणात ब्रेक लागलेला असताना, कोणत्याही चर्चे विना लोकसभेत गुरुवारी कर आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ मंजूर करण्यात आले.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहातील कामकाजादरम्यान सुरू असलेल्या प्रचंड गदारोळात अखेर कोणत्याही चर्चेविना ’कर आणि इतर कायदे दुरुस्ती विधेयक २०२६’ मंजूर झाले. लोकसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवर केलेल्या गदारोळामुळं या विधेयकावर चर्चा होऊ शकली नाही.

विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यापासून ते मेड इन इंडिया या महत्वाकांक्षी उपक्रमावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी देशांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स मॅन्यूफॅक्चरिंगला प्रोत्साहन देण्याचा या विधेयकाचा प्रमुख उद्देश असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. याशिवाय या विधेयकामध्ये देयक आणि निपटारा प्रणाली कायदा, २००७ (पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम अ‍ॅक्ट २००७) मध्येही दुरुस्ती करण्याची तरतूद **(पान ४ वर)**

## सोशल मीडियावर बदनामीकारक पोस्टप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा

### गटविकास अधिकाऱ्यांवर जातीवाचक शिवीगाळचा आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या ग्रामपंचायत मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान दिशाभूल करणारी व बदनामीकारक माहिती सोशल मीडियासह विविध माध्यमांतून प्रसारित केल्याप्रकरणी शेवगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सोनल शहा यांच्या फिर्यादीवरून शेवगाव पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर ग्रामपंचायतचे कर्मचारी यांनी परस्परविरोधी दिलेल्या तक्रारीत गट विकास अधिकाऱ्यांवर जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप केला आहे. याबाबत शेवगाव पोलीस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी दाखल झाले आहेत.



पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, उमेश भालसिंग (रा. वाघोली, ता. शेवगाव) आणि शिवाजी भिसे यांनी मोबाईल, सोशल मीडिया पोस्ट, स्टेटस, संपादित छायाचित्रे तसेच अन्य माध्यम ांचा वापर करून कोणताही ठोस पुरावा नसताना बदनाम ीकारक मजकूर प्रसारित केला. या मजकुरातून फिर्यादींना भ्रष्ट अधिकारी असे संबोधून त्यांच्या वैयक्तिक तसेच प्रशासकीय प्रतिमेला धक्का पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. परवानगीशिवाय फेसबुकवरील छायाचित्रांचा वापर करून त्यावर बदनामीकारक मजकूर जोडून तो सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आला. तसेच ग्रामसेवकांना मुख्यालयी राहण्याचे आदेश दिल्यानंतर शासकीय कामकाजात अडथळे निर्माण करण्याच्या उद्देशाने निषेधात्मक पोस्ट प्रसारित करून जाणीवपूर्वक प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न झाल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी शेवगाव पोलिसांनी संबंधित दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, वाघोली ग्रामपंचायतीचे कर्मचारी भाऊसाहेब आगलावे यांनी शेवगाव पोलिस ठाण्यात प्रतितक्रार दाखल केली. गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी आपल्याविरुद्ध खोटा गुन्हा दाखल केला असून तो तातडीने रद्द करण्यात यावा, तसेच त्यांनी जातीवाचक शिवीगाळ करून अपमान केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल करावा. अशी मागणी केली आहे.

वाघोली ग्रामपंचायतीच्या विहीर खरेदी प्रस्तावासंदर्भात झालेल्या भेटीदरम्यान हा प्रकार घडल्याचा दावा प्रतितक्रारीत करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही तक्रारदारांनी दिला आहे. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने शेवगाव पोलिस ठाण्यात उपस्थित होते. या दोन्ही प्रकरणांबाबत शेवगाव पोलिसांकडून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू असल्याचे समजते.

# गोदावरीचे पाणी परक्या दारी... तुटीच्या खोऱ्यावरील अन्याय कधी थांबणार?




महाराष्ट्राला निसर्गाने पाच प्रमुख नदीखोऱ्यांचे वरदान दिले आहे. कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा आणि पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्या अशी ही रचना आहे. मात्र राज्याच्या जलधोरणात आणि पाणीवाटपाच्या कायद्यात या भौगोलिक वास्तवाचा पुरेसा विचार झालेला दिसत नाही. परिणामी, राज्यातील सर्वाधिक लोकसंख्या आणि शेतीचा भार सांभाळणारे गोदावरी खोरे आजही कायम पाण्याच्या तुटवड्याशी झुंज देत आहे. गोदावरीच्या हक्काचे पाणी तिच्याच खोऱ्यातील नागरिकांना न देता ते कृष्णा खोऱ्याकडे वळविले जात आहे, हे या खोऱ्यातील नागरिकांचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

'साप्ताहिक साधना'मध्ये प्रकाशित जलतज्ज्ञ भास्करराव खंडागळे यांच्या लेखात मांडलेली आकडेवारी आणि निरीक्षणे अत्यंत विचार करायला लावणारी आहेत. सन २००५ मध्ये झालेल्या राज्याच्या समन्यायी पाणीवाटप कायद्याचा उद्देश चांगला असला, तरी त्याची अंमलबजावणी गोदावरीसारख्या तुटीच्या खोऱ्यासाठी अन्यायकारक ठरत असल्याचे वास्तव या लेखातून अधोरेखित होते. आज या विषयाकडे केवळ कायद्याचा प्रश्न म्हणून नव्हे, तर सामाजिक, आर्थिक आणि प्रादेशिक न्यायाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

गोदावरी खोऱ्यातील धरणे, कालवे आणि जलसंपत्तीवर अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नाशिक, परभणी, हिंगोली, नांदेड अशा विस्तीर्ण प्रदेशाचा जीवनक्रम अवलंबून आहे. या भागात पर्जन्यमान अनिश्चित आहे. दुष्काळाचे चक्र वारंवार येते. शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्याने पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा ठरतो. अशा परिस्थितीत गोदावरी खोऱ्यातील उपलब्ध पाणीच दुसऱ्या नदीखोऱ्यात वळविण्याची धोरणे जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरतात.

गोदावरी खोऱ्यातील अनेक प्रकल्पांचे पाणी कृष्णा खोऱ्याकडे वळविण्यात आले आहे. यामुळे मूळ खोऱ्यातील सिंचन क्षमता कमी झाली, अनेक प्रकल्पांचे लाभक्षेत्र कागदावरच राहिले आणि हजारो हेक्टर शेतीला अपेक्षित पाणी मिळाले नाही. एकीकडे गोदावरी खोऱ्यातील शेतकरी दुष्काळामुळे हवालदिल आहे, तर दुसरीकडे त्याच खोऱ्यातील पाणी दुसऱ्या प्रदेशात पोहोचत आहे. हा विरोधाभास राज्याच्या जलनियोजनावर प्रश्नचिन्ह उभे करतो.

प्रश्न केवळ गोदावरीचे पाणी कृष्णा खोऱ्यात नेण्याचा नाही; तर राज्यातील इतर नदीखोऱ्यांमध्ये उपलब्ध असलेल्या अतिरिक्त जलसंपत्तीचा संतुलित वापर का केला जात नाही, हा आहे. कोकणातील अनेक नद्या दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पाणी समुद्रात वाहून नेतात. काही खोऱ्यांमध्ये जलउपलब्धता तुलनेने अधिक आहे. आधुनिक अभियांत्रिकी, नदीजोड प्रकल्प आणि दीर्घकालीन जलनियोजनाच्या माध्यमातून या अतिरिक्त पाण्याचा काही भाग गोदावरीसारख्या तुटीच्या खोऱ्यात आणण्याचा गंभीर विचार होणे अपेक्षित होते. परंतु तसे न करता, आधीच पाण्याअभावी त्रस्त असलेल्या गोदावरी खोऱ्यावरच अधिक भार टाकला जात आहे.

समन्यायी पाणीवाटप म्हणजे सर्वांना समान पाणी वाटणे नव्हे; तर गरज, उपलब्धता, भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक विषमता लक्षात घेऊन न्याय्य वाटप करणे होय. दुष्काळी प्रदेश आणि जलसमृद्ध प्रदेश यांना एकाच तराजूत तोलणे ही समता नव्हे. त्यामुळे विद्यमान कायद्याचा फेरआढावा घेऊन नदीखोऱ्यांच्या वास्तव परिस्थितीनुसार सुधारणा करणे ही काळाची गरज आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचा प्रश्न तर अधिक गंभीर आहे. जिल्ह्यातील अनेक तालुके वर्षानुवर्षे टँकरवर अवलंबून असतात. भूजलपातळी सातत्याने खाली जात आहे. शेतीचे उत्पादन घटत आहे. उद्योगधंद्यांवरही त्याचा परिणाम होत आहे. अशा वेळी गोदावरी खोऱ्यातील प्रत्येक थेंब या प्रदेशासाठी अमूल्य आहे. तो इतरत्र वळविण्यापूर्वी या खोऱ्याच्या गरजा पूर्ण झाल्या आहेत का, याचे उत्तर शासनाने द्यायला हवे.

राज्य शासनाने आता केवळ धरणांची उंची वाढविणे किंवा नवीन प्रकल्प जाहीर करणे यापलीकडे जाऊन राज्याच्या पाचही नदीखोऱ्यांचा समन्वित जलआराखडा तयार करणे आवश्यक आहे. ज्या खोऱ्यांमध्ये अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे, तेथून वैज्ञानिक पद्धतीने पाणी तुटीच्या खोऱ्यात वळविण्याचे नियोजन व्हावे. नदीजोड, पुनर्भरण, जलसंवर्धन आणि स्थानिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन यांचा एकत्रित विचार झाला, तरच भविष्यातील जलसंकटावर मात करता येईल.

गोदावरी ही केवळ नदी नाही; ती मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी आहे. तिच्या पाण्यावर लाखो शेतकरी, उद्योग, गावांचे पिण्याचे पाणी आणि संपूर्ण सामाजिक जीवन अवलंबून आहे. त्यामुळे गोदावरीच्या हक्काच्या पाण्यावर गदा आणणारे कोणतेही धोरण पुनर्विचाराशिवाय स्वीकारले जाऊ नये.

जलसंपत्ती ही केवळ अभियांत्रिकीचा विषय नाही; ती सामाजिक न्यायाचा विषय आहे. त्यामुळे शासनाने समन्यायी पाणीवाटप कायद्याचे पुनर्मूल्यांकन करून गोदावरी खोऱ्यावर होत असलेला अन्याय दूर करावा, अतिरिक्त जलसंपन्न खोऱ्यांतील पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्याकडे वळविण्याचा दीर्घकालीन आराखडा जाहीर करावा आणि ''प्रत्येक नदीखोऱ्याला तिच्या गरजेनुसार न्याय'' हे जलधोरणाचे नवे सूत्र स्वीकारावे. अन्यथा गोदावरीचे पाणी परक्याच्या दारी जात राहील आणि गोदाकाठचा शेतकरी दुष्काळाच्या छायेतच आयुष्य घालवत राहील.

# डॉ. तनपुरे कारखाना पुन्हा सुरू होण्याच्या आशा पल्लवित, सभासदांमध्ये आनंद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राज्यातील अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या १९ सहकारी साखर कारखान्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्र सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठी राज्य सरकारकडे संबंधित कारखान्यांची आर्थिक स्थिती, कर्ज, मालकी हक्क, न्यायालयीन प्रकरणे तसेच पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे.

या यादीत अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरीचा डॉ. बाबूराव तनपुरे सहकारी साखर कारखान्याचाही समावेश असून, आर्थिक अडचणी, बँकांची जप्ती आणि थकबाकीमुळे हा कारखाना अनेक वर्षांपासून बंद आहे. केंद्र सरकारकडून प्रत्येक कारखान्याचा स्वतंत्र आढावा घेऊन पुनरुज्जीवनाचा आराखडा तयार केला जाणार आहे. आवश्यकतेनुसार आर्थिक मदत, पुनर्गुंतवणूक तसेच राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ अर्थात एनसीडीसी, अमूल आणि इफको यांसारख्या संस्थांच्या सहकार्याने कारखाने पुन्हा सुरू करण्याचा पर्याय विचाराधीन आहे.

तनपुरे साखर कारखान्यावर माजीमंत्री तथा आ. प्राजक्त तनपुरे यांचे चुलते अरुण तनपुरे यांच्या अधिपत्याखालील संचालक मंडळाकडे सत्ता आहे. प्राजक्त तनपुरे यांनी भाजपात प्रवेश करून विधानपरिषदेवर बिनविरोध विजय मिळविला. यामुळे तनपुरे यांना केंद्र सरकार अर्थात भाजपकडून कारखाना सुरू होण्यासाठी ताकद मिळू शकते.

केंद्र सरकारच्यामदतीने तनपुरे कारखाना पुनर्जीवित झाल्यास राहुरी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी, कामगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, डॉ. तनपुरे साखर कारखाना पुन्हा सुरू होणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# चार हजार कोटींच्या दाव्याचा फज्जा

## टाकळी - ब्राम्हणगाव रस्त्याची दुरावस्था

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** मतदारसंघात आ. काळे यांचे विकासकामांच्या नावाखाली करण्यात आलेल्या चार हजार कोटी रुपयांच्या दाव्याचा फज्जा उडाल्याचे वास्तव आता नागरिकांसमोर आले आहे. टाकळी-ब्राम्हणगाव या महत्त्वाच्या रस्त्याची अवघ्या काही काळातच झालेली अत्यंत दयनीय अवस्था ही निकृष्ट दर्जाची साक्ष देत असून, संपूर्ण मतदारसंघातील रस्त्यांची झालेली चाळणी पाहता विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, अशी भावना अशोक बनकर यांनी व्यक्त केली आहे.

टाकळी-ब्राम्हणगाव मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्यावरील डांबर पूर्णपणे उखडले आहे व दगड उघडे पडले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वार, चारचाकी चालक, शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शेतकऱ्यांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात या रस्त्याची परिस्थिती आणखी बिकट होत असून अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

एकीकडे चार हजार कोटींच्या विकासकामांचा गवगवा केला जात असताना प्रत्यक्षात नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. टाकळी-ब्राम्हणगाव रस्ता हा केवळ एक नमुना असून मतदारसंघातील अनेक प्रमुख आणि अंतर्गत रस्त्यांची अवस्था यापेक्षाही गंभीर आहे. त्यामुळे मोठमोठ्या घोषणांपेक्षा दर्जेदार आणि टिकाऊ



विकासकामांची गरज असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

मागील पंचवार्षिक कार्यकाळ आणि त्यानंतरचा सध्याचा कार्यकाळ तरीही मतदारसंघात सर्वसामान्यांना जाणवेल असा विकास दिसून येत नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. रस्ते, पाणी, पायाभूत सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे आ.काळे यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

# शिर्डीच्या साई निर्माण ग्रुपच्या 'बारा ज्योतिर्लिंग' यात्रेची संकल्प पुर्ती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** साई निर्माण ग्रुपचे अध्यक्ष विजयराव कोते आणि उपाध्यक्ष पंकज लोढा यांच्या संकल्पनेतून गेली १२ वर्षे सुरू असलेल्या बारा ज्योतिर्लिंग यात्रेची यंदा भव्य स्वरूपात सांगता होत आहे. साईसच्चरित्र पारायण करणाऱ्या हजारो साईभक्तांसाठी यंदा २९ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत पशुपतिनाथ (नेपाळ), काशी विश्वनाथ आणि प्रभू श्रीरामांची जन्मभूमी अयोध्या या पवित्र तीर्थक्षेत्रांची एक आगळीवेगळी आध्यात्मिक यात्रा आयोजित करण्यात आली आहे. यंदाची ही यात्रा बारा ज्योतिर्लिंग यात्रेच्या १२ वर्षांच्या यशस्वी प्रवासाची सांगता करणारी ठरणार असून, साईबाबांच्या पवित्र पालखीसह होणाऱ्या या अखेरच्या यात्रेत सहभागी होण्यासाठी राज्यासह देशभरातील साईभक्तांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

गेल्या १२ वर्षांत या उपक्रमांतर्गत तब्बल २५ हजार साईभक्तांना भारतातील सोमनाथ, मल्लिकार्जुन, महाकालेश्वर, ओंकारेश्वर, केदारनाथ, भीमाशंकर, काशी विश्वनाथ, त्र्यंबकेश्वर, वैद्यनाथ, नागेश्वर, रामेश्वर आणि घृष्णेश्वर या बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घडविण्यात आले आहे. आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्य असलेल्या भाविकांनाही तीर्थयात्रेचा लाभ



मिळावा, या उदात्त सामाजिक भावनेतून हा उपक्रम अखंडपणे सुरू ठेवण्यात आला. या यात्रेच्या माध्यमातून केवळ तीर्थदर्शनच घडले नाही, तर साईबाबांच्या 'सर्वधर्मसमभाव' या विचारांचाही देशभरात प्रसार करण्यात आला आहे.

ही यात्रा साईनिर्माण ग्रुप, साईसिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्डी आणि शिर्डी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जाते. या संपूर्ण उपक्रमाला साईनिर्माण ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष विजय कोते, उपाध्यक्ष पंकज लोढा, शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलासबापू कोते, शिर्डी ग्रामस्थ, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खा. डॉ. सुजय विखे यांचे सातत्याने मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

# हवामानाचा फटका बसल्यास ट्रॅव्हल इन्श्युरन्स कसा ठरतो आधार ?

## वादळ, पूर, फ्लाईट विलंब, ट्रिप रद्द... कोणत्या परिस्थितीत मिळते आर्थिक सुरक्षा?

प्रवास म्हणजे नवीन अनुभव, नवीन ठिकाणे आणि आनंददायी आठवणी. मात्र, बदलत्या हवामानामुळे प्रवासादरम्यान अचानक उद्भवणारे पूर, चक्रीवादळ, मुसळधार पाऊस, उष्णतेच्या लाटा किंवा जंगलातील वणवे यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे अनेकदा नियोजन विस्कळीत होते. अशा परिस्थितीत ट्रॅव्हल इन्श्युरन्स आर्थिक संरक्षण देणारा महत्त्वाचा आधार ठरतो.

खराब हवामानामुळे प्रवास रद्द झाल्यास फ्लाईट, हॉटेल किंवा टूर बुकिंगवरील नॉन-रिफंडेबल खर्चाची भरपाई अनेक पॉलिसींमध्ये केली जाते. तसेच फ्लाईटला ठरावीक वेळेपेक्षा जास्त विलंब झाल्यास जेवण, हॉटेल मुक्काम किंवा अन्य आवश्यक खर्चाचाही समावेश असू शकतो. हवामानामुळे कनेक्टिंग फ्लाईट चुकल्यास री-बुकिंग आणि अतिरिक्त मुक्कामाचा खर्चही काही पॉलिसींमध्ये कव्हर केला जातो.




अत्यंत खराब हवामानामुळे प्रवास अर्धवट सोडावा लागल्यास किंवा विमान दुसऱ्या शहरात वळवल्यामुळे अतिरिक्त मुक्काम करावा लागल्यास त्यासाठीही आर्थिक मदत मिळू शकते. विमानतळावरील अडचणींमुळे सामान उशिरा मिळाल्यास आवश्यक कपडे, प्रसाधने आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या खर्चाची भरपाई करण्याची तरतूदही अनेक ट्रॅव्हल इन्श्युरन्स योजनांमध्ये असते. तज्ज्ञांच्या मते, परदेश प्रवासापूर्वी हवामानाशी संबंधित जोखमींचा समावेश असलेली सर्वसमावेशक ट्रॅव्हल इन्श्युरन्स पॉलिसी निवडणे आवश्यक आहे. प्रवासादरम्यान हवामानाचा अंदाज, सरकारी सूचना आणि एअरलाईनचे अपडेट्स नियमित तपासणे, सर्व बुकिंग व खर्चाच्या पावत्या सुरक्षित ठेवणे तसेच अडचण निर्माण होताच तत्काळ इन्श्युरन्स कंपनीशी संपर्क साधणे क्लेम प्रक्रियेसाठी महत्त्वाचे ठरते.

हवामानातील अनिश्चितता वाढत असताना ट्रॅव्हल इन्श्युरन्स हा केवळ औपचारिक पर्याय नसून सुरक्षित आणि निश्चिंत प्रवासासाठी आवश्यक संरक्षण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**-श्री. राकेश कौल**
**(चीफ डिस्ट्रीब्यूशन ऑफिसर - रिटेल बिझनेस)**
**बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड**

# एमपीएससीत यश ; त्रिमूर्तीचे माजी विद्यार्थी प्रकाश शिंदे सहाय्यक राज्यकर आयुक्तपदी

**नेवासा :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रकाश कुशाहरी शिंदे यांनी एमपीएससी-२०२४ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महाराष्ट्र शासनाच्या सहाय्यक राज्यकर आयुक्त या प्रतिष्ठित पदावर निवड मिळवली आहे. या यशानिमित्त त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या वतीने प्रकाश शिंदे यांचा सत्कार व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने जिद्द, सातत्य आणि मेहनतीच्या जोरावर मिळविलेल्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. यावेळी प्रकाश शिंदे यांनी एमपीएससीच्या तयारीतील अडचणी, अभ्यासाचे नियोजन, सातत्याचे महत्त्व आणि



यशाचे गमक विद्यार्थ्यांसमोर उलगडले. त्यांच्या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त लाभ घेतला. कार्यक्रमात संस्थेच्या उपाध्यक्षा ॲड. स्नेहल चव्हाण-पाटील यांच्या हस्ते शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य सोपानराव काळे, निवासी प्राचार्य एकनाथ कापसे, उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे, विभागप्रमुख बाळासाहेब साबळे, जितेंद्र पाटील, नामदेव ताके, मिलिंद सोनवणे, बाबासाहेब तांबे, माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण दळे यांनी केले, तर आभार महेश शिंदे यांनी मानले. संस्थेच्या अध्यक्षा सुमतीताई साहेबराव घाडगे पाटील यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रकाश शिंदे यांचे अभिनंदन करून पुढील प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# घुलेवाडीचा पाणी प्रश्न महिनाभरात मार्गी लावा प्रवीण सिनारे यांचे ग्रामपंचायत प्रशासनाला निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** पाणीपुरवठा विभागाच्या अनागोंदी कारभाराची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती स्थापन करून दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, तसेच घुलेवाडीचा पाणीप्रश्न येत्या महिनाभरात मार्गी लावा असे निर्देश गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी घुलेवाडी ग्रामपंचायत प्रशासनाला दिले

घुलेवाडी गावातील पाणीटंचाईच्या प्रश्नावर ग्रामस्थांनी पंचायत समिती प्रवेशद्वारावर उपोषण सुरू केले होते या उपोषणाची गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी गंभीर दखल घेत तातडीने त्यांच्या दालनामध्ये उपोषण कर्ते आणि घुलेवाडी ग्रामपंचायत प्रशासन यांची संयुक्त बैठक घेण्यात आली . या बैठकीत लाखो रुपये खर्च करून घुलेवाडी ग्रामपंचायतने प्रवरा नदीवरून पाईप लाईन



आणली होती मात्र प्रवरा नदीला पूर आल्यानंतर ती पाईपलाईन वाहून गेली आहे. त्यामुळे नदीला पाणी असूनह घुलेवाडी गावा सह उपनगरात पावसाळ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे.यावर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी ग्रामपंचायतीने काय उपाययोजना केली तसेच निळवंडे डाव्या कालव्यामध्ये मळीमिश्रित पाणी सोडल्यामुळे पाणी पिण्यायोग्य नाही असे एकामागे एक अनेक प्रश्न ग्रामस्थांनी गटविकासअधिकारी सिनारे यांच्यापुढे उपस्थित केले त्या वर प्रवरा नदीच्या पुरात वाहून गेलेली पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन बाबतचे अंदाजपत्रक(इस्टिमेट) तयार करून भविष्यामध्ये अशी समस्या निर्माण होणार नाही,यासाठी कायम स्वरूपी पाईप लाईन टाकण्याबाबत ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी असे सक्त निर्देश

**संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी ग्रामपंचायतीच्या कारभाराची खाते निहाय चौकशी करून आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी करावी कचरा व्यवस्थापन, स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न तसेच गावातील मेलेली जनावरे उचलून त्यांची योग्य विल्हेवाट लावावी असे एका मागे एक प्रश्न उपस्थित करत या प्रमुख प्रश्नांकडे ग्रामस्थांनी गट विकास अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.**

गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी घुलेवाडी ग्रामपंचायतीच्या प्रशासनास दिले. तसेच निळवंडे डाव्या कालव्यातून मळीमिश्रित पाणी सोडण्यात आल्याची गंभीर बाब गट विकास अधिकाऱ्यांपुढे उपस्थित केली त्यावर निळवंडे पाटातून येणारे पाणी पिण्यायोग्य नसून तपासणी अहवाल निगेटिव्ह आला असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी चांगदेव दरेकर यांनी दिली. मात्र ग्रामस्थांनी केवळ या अहवालावरती समाधान न मानता पाण्याचे नमुने मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासूनच नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करावा नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ देऊ नये, अशी मागणी केली. त्यावर जोपर्यंत वाहून गेलेली पाईपलाईन दुरुस्त होत नाही, तोपर्यंत घुलेवाडी गावाला आणि उपनगराला बारव तसेच इतर दोन विहिरींमधून पर्यायी पाणीपुरवठा करण्याबाबतचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी सी जे दरेकर यांनी दिली. तसेच ग्रामपंचायत प्रशासनाने गावातील नागरिकांना किमान चार दिवसांतून नियमितपणे पाणी कसे मिळेल यासाठीचेनियोजन केले जाईल असे आश्वासन ग्राम विकास अधिकारी दरेकर यांनी दिले.

# पेन्शन वाढीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी संसदेत सातत्याने पाठपुरावा करणार : खा. वाकचौरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने ईपीएफओ पेन्शनधारकांच्या पेन्शनवाढीसाठी नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आयोजित राष्ट्रव्यापी महाआंदोलनाला शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार वाकचौरे यांनी भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी त्यांनी पेन्शन वाढीचा प्रश्न कोणत्याही परिस्थितीत मार्गी लावण्यासाठी संसदेत सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

खासदार वाकचौरे म्हणाले, पेन्शनधारकांच्या मागण्यांसाठी अनेक आंदोलने व केंद्रीय कामगार मंत्र्यांसोबत चर्चा होऊनही गेल्या दहा वर्षांत निर्णय झालेला नाही. लोकसभेतही हा प्रश्न वारंवार उपस्थित केला असून, पुढेही करत राहणार आहे. संसदीय समितीने २०१३-१४ मध्ये किमान सात हजार रुपयांच्या पेन्शनची शिफारस केली होती, मात्र त्याची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनाही न्याय मिळायलाच हवा, असे त्यांनी नमूद केले.

आंदोलनस्थळी खासदार श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के व श्रीरंग बारणे यांनीही भेट देऊन पाठिंबा दर्शविला. राष्ट्रीय संघर्ष समितीचे अध्यक्ष कमांडर राऊत यांनी मागण्या मान्य होईपर्यंत देशभरात ईपीएफओ कार्यालयांवर टाळा ठोको, जेलभरो व आमरण उपोषणासारखी आंदोलने सुरू ठेवण्याचा इशारा दिला. या आंदोलनात देशभरातील तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील पदाधिकारी व पेन्शनधारक मोठ्या संख्येने सहभागी झाले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## वीज चोरी तपासणी पथकाला धमकी देणाऱ्यास दंडाची शिक्षा

**श्रीरामपूर :** येथे ८ फेब्रुवारी २०२० रोजी महावितरणच्या पथकावर कारवाईदरम्यान हल्ला करणाऱ्या शिवाजी बन्सी कहांडळ (वय ६७) या आरोपीला सत्र न्यायालयाने दोषी ठरवले आहे. पथक वीजचोरी व थकबाकी तपासत असताना आरोपीने शिवीगाळ करत हातात कोयता घेऊन सरकारी कामात अडथळा आणला व जीवे मारण्याची धमकी दिली होती. श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन खटला चालला. मा. सत्र न्यायाधीश-२ श्री. एस. एस. देशपांडे यांनी ८ साक्षीदार व पुराव्यांच्या आधारे आरोपीला कलम ३५३ अन्वये १०,००० रुपये दंड आणि कलम ५०६ अन्वये ३,००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंडास कसूर झाल्यास शिक्षेची तरतूद आहे.

## टाळ-मृदंगाच्या गजरात उद्या निघणार, कोळपेवाडी-पुणतांबा पायी दिंडी

**कोळपेवाडी** : भागवताचार्य प.पू. गोवर्धन महाराज (सुरेगाव आश्रम) यांच्या मार्गदर्शनाखाली समस्त कोळपेवाडी, शहाजापूर, माहेगाव देशमुख, कोळगाव थडी व पंचक्रोशीतील वारकरी मंडळांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र कोळपेवाडी ते श्री क्षेत्र पुणतांबा पायी दिंडी सोहळ्याचे यंदा बाराव्या वर्षी आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार (दि.७) रोजी सकाळी ८.०० वाजता श्री क्षेत्र कोळपेवाडी येथून प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पालखीचे विधिवत पूजन करून दिंडीचे शुभप्रस्थान होणार आहे. विठ्ठल-रखुमाईच्या नामघोषाने दुमदुमणारा परिसर, टाळ-मृदंगाचा मंगल निनाद, भगव्या पताकांचे वैभव आणि हरिनामात तल्लीन झालेले वारकरी यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे अशी माहिती दिंडी चालक ह.भ.प.आण्णा महाराज कोळपे यांनी दिली. या पायी दिंडीमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी संपूर्ण मार्गावर विविध ठिकाणी चहा, नाश्ता, पिण्याचे पाणी तसेच महाप्रसादाच्या भोजनाची व्यवस्था भाविकांच्या सेवाभावी सहकार्याने करण्यात आली आहे. पंचक्रोशीतील शेकडो महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ वारकरी दरवर्षी मोठ्या श्रद्धेने या दिंडीत सहभागी होत असून, यंदाही मोठ्या संख्येने भाविक सहभागी होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. या पवित्र दिंडी सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी आणि संतपरंपरेच्या या भक्तिमय सोहळ्यात सहभागी होण्यासाठी सर्व भाविकांनी शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ८.०० वाजता श्री क्षेत्र कोळपेवाडी येथे वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन दिंडी चालक ह.भ.प. आण्णा महाराज कोळपे यांनी केले आहे. रामकृष्ण हरी, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या अखंड नामघोषात निघणारा हा दिंडी सोहळा भक्ती, सेवा आणि समर्पणाचा अविस्मरणीय सोहळा ठरणार आहे.

## राहात्यात पाणीपुरवठा करा, नगरसेवक लोळगे यांची मागणी

**शिर्डी :** पावसाळ्याचे दिवस असून ओहर फ्लो चे पाणी कातनाल्यात मोठ्या प्रमाणात आलेले आहे, पाणी साठा भरपूर असून देखील राहाता नगरपालिका शहरासाठी ३ दिवसा आड पाणी पुरवठा करत असल्याने दररोज पाणी द्यावे असे नगरसेवक शशिकांत विश्वनाथ लोळगे यांनी मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे. त्यात म्हटले की, राहाता शहरातील दिवसेंदिवस लोकसंख्येत वाढ होत आहे. हॉटेल व्यावसायिक व इतर व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात पाणी लागते. त्यामुळे नेहमीच पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते. तरी नगरपालिका प्रशासनाने पूर्वी प्रमाणे दिवसा आड पाणी पुरवठा सुरू करून नागरिकांच्या पाणी टंचाईची समस्या सोडवावी, अशी मागणी नगरसेवक शशिकांत लोळगे यांनी केली आहे.

# 'ड्रग्स फ्री अहिल्यानगर' रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग






**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने 'ड्रग्स फ्री अहिल्यानगर' या अभियानांतर्गत श्रीरामपूर शहरात भव्य नशामुक्ती जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. श्रीरामपूर पोलीस प्रशासन व डी. डी. काचोळे माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील प्रमुख मार्गावरून ही रॅली काढण्यात आली.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार, अप्पर पोलीस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या नेतृत्वात ही रॅली यशस्वीरीत्या पार पडली. या उपक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातर्फे आयोजित या अमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅलीद्वारे समाजात नशामुक्तीचा जोरदार संदेश देण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'नशामुक्त भारत' या संकल्पनेला तसेच शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत राज्यभरात या अभियानाची सुरुवात करण्यात आली असून, यात अहिल्यानगर जिल्हा आघाडीवर असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

रॅलीचा समारोप डी. डी. काचोळे विद्यालयाच्या मैदानावर करण्यात आला. या वेळी १२०० हून अधिक विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत नशामुक्त समाजासाठी आपली बांधिलकी व्यक्त केली. युवा पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यातून वाचवून एक आदर्श समाज निर्माण करण्यासाठी अशा मोहिमा अत्यंत आवश्यक असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. विशेषतः १३ ते १९ वयोगटातील तरुणांनी नशेपासून दूर राहून संपूर्ण जिल्हा 'ड्रग्स फ्री' करण्यासाठी स्वतः पुढाकार घ्यावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी उपस्थितांना केले.

## मोकाट जनावरांचा बंदोबस्त करा; अन्यथा आंदोलन : स्वप्नील मापारी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा शहरातील चौकाचौकात वाढलेल्या मोकाट जनावरांच्या त्रासामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नगरसेवक स्वप्नील मापारी यांनी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात शहरात मोकाट कुत्रे, गाढवे, डुक्करे आणि गुरांचा मोठ्या प्रमाणावर वावर असल्याने लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मोकाट कुत्र्यांकडून नागरिकांवर हल्ले होत असून, गाढवे व डुकरांमुळे धार्मिक स्थळांचे पावित्र्यही बाधित होत आहे. तसेच रस्त्यांवर घाण होत असल्याने सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या जनावरांसाठी कोंडवाडा उभारावा आणि संबंधित मालकांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यापूर्वीही अनेक वेळा नागरिक, नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदने दिली; मात्र नगरपंचायतीने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचा आरोप करण्यात आला. योग्य ती कारवाई न झाल्यास नगरपंचायतीसमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. नगरपंचायतीचे कार्यालयीन अधीक्षक सागर झावरे यांनी निवेदन स्वीकारून ३१ ऑगस्टपर्यंत मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याचे आश्वासन दिले. यावेळी नगरसेवक स्वप्नील मापारी यांच्यासह अनेक महिला व नागरिक उपस्थित होते.

> नगरपंचायत प्रशासनाने नागरिकांच्या या समस्यावर त्वरित कारवाई करावी व जनावरांपासून होणाऱ्या त्रासातून नेवासकर नागरिकांना मुक्ती द्यावी त्याच्या जीवाशी खेळू नये.
> **कुणाल मांडण, सामाजिक कार्यकर्ते...**

## कामिका एकादशी यात्रेनिमित्त नेवासात वाहतुकीत बदल

### अवजड वाहनांसाठी पर्यायी मार्ग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरात रविवारी (९ ऑगस्ट) होणाऱ्या कामिका एकादशी यात्रेनिमित्त भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी वाहतुकीत तात्पुरते बदल करण्याचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार ८ ऑगस्ट रात्री १० वाजल्यापासून ९ ऑगस्ट रात्री १२ वाजेपर्यंत श्रीरामपूर-शेवगाव मार्गावरील अवजड वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.

दरवर्षी पैस खांबाच्या दर्शनासाठी चार ते पाच लाख भाविक नेवासात येतात. यंदाही मोठी गर्दी अपेक्षित असल्याने नेवासा फाटा ते नेवासा बुद्रुक मार्गावर पायी चालणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

आदेशानुसार, नेवासा फाट्याकडून श्रीरामपूरकडे जाणारी अवजड वाहने प्रवरासंगम, सिद्धेश्वर मंदिर, वाशिम, टोका, गोधेगाव, भालगाव, नेवासा बुद्रुक व टाकळीभान मार्गे जातील. तर श्रीरामपूरकडून शेवगावकडे जाणारी वाहने टाकळीभान, नेवासा बुद्रुक, भालगाव, वाशिम, टोका, सिद्धेश्वर मंदिर, प्रवरासंगम व नेवासा फाटा मार्गे वळविण्यात येतील.

शासकीय वाहने, रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि स्थानिक प्रशासनाने परवानगी दिलेल्या अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी वाहनचालकांनी वाहतूक आदेशांचे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## महावितरण कर्मचाऱ्याला धमकावून शासकीय कामात अडथळा, राजापूरच्या युवकावर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : राजापूर येथील ३३/११ केव्ही उपकेंद्रात महावितरणच्या कर्मचाऱ्याला धमकी देऊन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी प्रमोद शिवराम हासे (रा. राजापूर, ता. संगमनेर) याच्याविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महावितरणच्या कुरण शाखेचे सहाय्यक अभियंता दुर्गेश अनिल जगताप यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ ऑगस्ट रोजी रात्री राजापूर कृषी फीडरवरील लोडशेडिंगच्या कारणावरून आरोपीने कार्यालयाच्या दूरध्वनीवर संपर्क साधत कर्मचाऱ्याला धमकी दिली. त्यानंतर ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी आरोपी थेट राजापूर उपकेंद्रात पोहोचला. तेथे गुंजाळवाडी येथील एबी स्विच परवानगीशिवाय उघडून वीज वितरण व्यवस्थेत हस्तक्षेप केला. तसेच ड्युटीवर असलेल्या यंत्रचालक कर्मचाऱ्याला दमदाटी करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या प्रकारामुळे वीज वितरण व्यवस्थेच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## हरेगाव येथे उद्या मोफत नेत्रतपासणी शिबिर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : अग्निपंख फाउंडेशनच्या वतीने व तुळसी आय हॉस्पिटल, नाशिक यांच्या सहकार्याने शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी मोफत नेत्रतपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर हरिगांव चर्चगेट समोर सकाळी १०.३० ते दुपारी २.०० या वेळेत पार पडणार आहे. या शिबिरामध्ये मोफत नेत्रतपासणी, मोफत मोतीबिंदू तपासणी, डोळ्यांच्या विविध आजारांचे निदान, अल्प दरात चष्म्यांचे वाटप तसेच पात्र रुग्णांसाठी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक तसेच मोतीबिंदू किंवा इतर डोळ्यांच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी स्वप्निल पंडित (ग्रामपंचायत सदस्य) यांच्याशी मो. ९८३४९८४१८३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे अग्निपंख फाउंडेशनच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## दुर्गापूर विद्यालयात विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या दुर्गापूर येथील प्रवरा माध्यमिक विद्यालय सामाजिक बांधिलकी जपत गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. दुर्गापूर गावातील शिक्षणप्रेमी सामाजिक कार्यकर्ते व माजी उपसरपंच आणि उद्योजक विठ्ठल बाबुराव पुलाटे यांनी आपल्या मेव्हण्याचे, माजी मुख्याध्यापक कै. अण्णासाहेब दशरथ साठे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा उपक्रम राबविला. त्यांच्या हस्ते विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना गणवेशांचे वितरण करण्यात आले. यावेळी गावचे कामगार पोलीस पाटील दिलीप पुलाटे, शांताराम पुलाटे, सागर पुलाटे, विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय शेळके शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

प्रो.फी जमा रु.
प्रो.पा.नं.
ने.ता. ४/९/२६
ता. ४/०८/२०२६

जे.ए.खान,
ॲडव्होकेट, श्रीरामपुर

श्रीरामपुर येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर यांचे कोर्टात
वा.चौ.अ. क्रमांक ५५/२०२६

नि. ५

१. बिसमिल्लाह गफुर शेख, वय-५९ वर्ष, धंदा-घरकाम,
२. हमीद गफुर शेख, वय-४७ वर्ष, धंदा-मजुरी,
३. सुभान गफुर शेख, वय-४४ वर्ष, धंदा-मजुरी,
१ ते ३ रा.मराठी शाळे जवळ, अशोकनगर,
ता. श्रीरामपुर जि.अ.नगर -**अर्जदार**

**विरुध्द**

१. मुमताज गफुर शेख, वय-४१ वर्षे धंदा-मजुरी,
२. अरसलान गफुर शेख, वय-२ वर्ष धंदा-काही नाही, १ ते २ रा. मराठी शाळे जवळ, अशोकनगर, ता. श्रीरामपुर जि.अ.नगर सामनेवाले

अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी.

आजरोज ज्याअर्थी अर्जातील गफुर जमाल शेख हे दि.६/४/२०२६ रोजी मयत झालेले आहे. त्यांना अर्जदार क्रमांक १ ही पत्नी आहे व अर्जदार क्रमांक २ व ३ ही मुले आहेत, तसेच सामनेवाले कमांक १ ही मयताची दुसरी पत्नी आहे व सामनेवाले कमांक २ हा तीचा मुलगा आहे.

मयत गफुर जमाल शेख हे अहिल्यानगर महानगरपालीका येथे सेवेस होते, ते फिटर म्हणुन महानगरपालीका, अहिल्यानगर येथील सेवेतुन निवृत्त आलेनंतर त्यांना कुटुंब निवृत्ती वेतन/पेन्शन चालु होती, दरम्यान गफुर शेख हे दिनांक ६/४/२०२६ रोजी प्रवरा हॉस्पीटल लोणी बुगा ता. राहाता जि.अहिल्यानगर येथे मयत झालेले आहेत व त्यांचे पश्चात कुटुंब पेन्शन चा लाभ मिळणेसाठी कायदेशिर वारसदार आहेत. अर्जदार यांनी अहिल्यानगर म.न.पा.यांचेकडे दि.१८/५/२०२६ रोजी कुटुंब निवृत्ती वेतन/पेन्शन अर्ज फॉर्म भरुन दिले असता संबंधित अधिकारी यांनी जा.क. ३७६ दिनांक ३/७/२०२६ चे पत्राव्दारे मे. कोर्टाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केली, सबब अर्जदार व सामनेवाले हे मयत गफुर जमाल शेख यांचे कायदेशिर वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्र मिळावे, करीता सदरचा सदरचा अर्ज आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहितगार वकील साहेबांमार्फत योग्य त्या पुराव्यानिशी या मे. कोर्टात हजर होवुन आपली हरकत नोंदवावी, अन्यथा अर्जदारांचा लागलीच पुरावा घेण्यात येवुन त्यांचे मागणीप्रमाणे दाखला देणेबाबत आदेश पारीत केला जाईल.

आजरोजी ०६/०८/२०१६ माझे सहीनिशी व मे. कोर्टाच शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लार्क**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, श्रीरामपूर**

शिक्का

**हुकूमावरुन**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, श्रीरामपूर**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एसआर/१८५/२०२६
नेवासा दिनांक १४/०७/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-अकबर बाबामिया शेख, रा. सोनई ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी श्री/श्रीम/कु.अकबर बाबामिया शेख, महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **जन्म** नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे **जन्म** नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, **जन्म** नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-अकबर बाबामिया शेख, गावाचे नाव-सोनई, जन्म दिनांक-०१/०६/१९८०

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **जन्म** नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलियदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एसआर/२०८/२०२६
नेवासा दिनांक २८/०७/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-दत्तात्रय बाबुराव परदेशी, रा. सोनई ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी श्री/श्रीम/कु.दत्तात्रय बाबुराव परदेशी, महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **जन्म** नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे **जन्म** नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, **जन्म - मृत्यु** नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-दत्तात्रय बाबुराव परदेशी, गावाचे नाव-सोनई, जन्म दिनांक-२३/११/१९७३

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **जन्म** नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलियदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एसआर/११८/२०२६
नेवासा दिनांक ०३/०८/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-सोमनाथ राघुजी बानकर रा. सोनई ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. आशा राजेंद्र चव्हाण महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **मृत्यु** नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे **मृत्यु** नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, **जन्म - मृत्यु** नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. आशा राजेंद्र चव्हाण, गावाचे नाव-सोनई, मृत्यु दिनांक-१६/०२/२००९

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **मृत्यु** नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलियदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहीर नोटीस

प्रोसेस फी जमा रुपये
प्रोसेस पान ता.
नेमलेली तारीख ०४/०९/२०२६
नि. क्र. ३३

वाय. के. शेख, ॲडव्होकेट
श्रीरामपूर

श्रीरामपूर येथील मे. मोटार अपघात न्यायाधिकरण साहेब यांचे कोर्टात
एम.ए.सी.पी. क्र. १६३/२०२०
पु. ने.ता. ०४/०९/२०२६

चि. निखिल संदिप खर्डे-**अर्जदार**
**विरुद्ध**
श्री. शंकर भास्कर धाडे व इतर - **सामनेवाले**
प्रति,
१) श्री. सुरेश बाजीराव कुसाळकर
रा. साईप्रसादनगर, शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी अर्जदार यांनी श्रीरामपूर येथील मे. मोटार अपघात न्यायालयामध्ये तुमचे विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेसाठी अपघात क्लेम दाखल केलेला आहे. सदर क्लेम अर्जामध्ये आपण सामनेवाला क्र. १ व २ असून आपणास मे. कोर्टामार्फत व रजि. ए. डी. ने सदर क्लेमच्या नोटीसा पाठविण्यात आलेल्या होत्या, परंतु आपणास सदर नोटीसा/समन्स बजावणी झालेली नसल्याने अर्जदाराने तुम्हांस जाहीर नोटीससाठी अर्ज केला होता. सदरचे अर्जावर मे. कोर्टाने हुकूम केल्याप्रमाणे तुम्हांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत किंवा सदर क्लेम अर्जाची नेमलेली तारीख ०४/०९/२०२६ या तारखेस आपण सकाळी ठिक १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः अथवा निर्दीष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे. आपण मुदतीत हजर राहिला नाही तर आपले काही म्हणणे नाही असे ग्राह्य धरण्यात येवून तुमचे विरुद्ध मे. न्यायालय एकतर्फी हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली असे.

**हुकूमावरुन**
**कामगिरी क्लार्क**
**जिल्हा न्यायालय, श्रीरामपूर**

शिक्का

**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, श्रीरामपूर**

### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी कोंभळी ता. कर्जत जि.अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम नरेश जानदेव शेळके रा. कोंभळी. ता.कर्जत जि. अहिल्यानगर यानी आधी नामे श्री/श्रौम रेश्मा बबन गांगर्डे या नावे जन्म । मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म/मृत्यू कोंभळी ता. कर्जत जि.अहिल्यानगर या ठीकाणी दि २९/१०/२००६ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबंधीत दि २७/०४/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यत्कीच्या जन्म/मृत्यू बाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**रवि सतवन**
**तहसिलदार कर्जत**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एसआर/२०५/२०२६
नेवासा दिनांक : ०३/०८/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-बबन शंकर राजगुरु, रा. तेलकुडगांव, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी श्री/श्रीम/कु बबन शंकर राजगुरु, रा. तेलकुडगांव, ता.नेवासा, महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे **जन्म** नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, **जन्म - मृत्यु** नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-बबन शंकर राजगुरु, गावाचे नाव - तेलकुडगांव, मृत्यु दिनांक-०१/०१/१९६६

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **जन्म** नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एसआर/२०३/२०२६
नेवासा दिनांक : ३०/०७/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-हुसेन गुलाब इनामदार, रा.खेडले परमानंद, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी श्री/श्रीम/कु.हुसेन गुलाब इनामदार, रा.खेडले परमानंद, ता.नेवासा, महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **जन्म** नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे **जन्म** नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, **जन्म - मृत्यु** नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-हुसेन गुलाब इनामदार, गावाचे नाव - खेडले परमानंद, जन्म दिनांक-०१/०६/१९६९

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **जन्म** नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एसआर/२२४/२०२६
नेवासा दिनांक : ०३/०८/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-जगदीश रंगनाथ पटारे, रा. घोडेगाव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. कोंडाबाई भागूजी दिवटे, घोडेगाव ता.नेवासा, महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **मृत्यु** नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे **मृत्यु** नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, **जन्म - मृत्यु** नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. कोंडाबाई भागूजी दिवटे, गावाचे नाव - घोडेगाव, मृत्यु दिनांक-१८/१०/२०१२

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **मृत्यु** नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एसआर/२९/२०२६
नेवासा दिनांक : २४/०६/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-बापुसाहेब देवराव कर्डिले, रा.गिडेगाव, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी श्री/श्रीम/कु.संकेत बापुसाहेब कर्डिले रा.गिडेगाव, ता.नेवासा, महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **जन्म** नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे **जन्म** नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, **जन्म - मृत्यु** नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-संकेत बापुसाहेब कर्डिले, गावाचे नाव - गिडेगाव, जन्म दिनांक-०६/०८/२००७

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **जन्म** नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### इंडिकेटर न देता वळलेल्या कारने घेतले दोन जीव

कायद्यान्वये अज्ञात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भटू अण्णा कारखिले पुढील तपास करीत असून, फरार चालकाचा शोध घेण्यासाठी विविध पथके कार्यरत आहेत.

### देशात येणार बायोगॅस क्रांती

ही योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारी ठरणार असल्याचा विश्वास केंद्र सरकारने व्यक्त केला आहे.ऊर्जा सुरक्षेला बळ सरकारच्या मते, बायोगॅस उत्पादनात वाढ झाल्यास नैसर्गिक वायूच्या आयातीवरील अवलंबित्व कमी होईल. त्यामुळे परकीय चलनाची बचत होण्याबरोबरच देशाच्या ऊर्जा सुरक्षेलाही बळ मि ळेल. जैविक कचऱ्याचा प्रभावी वापर झाल्याने हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी होऊन स्वच्छ आणि हरित ऊर्जेला चालना मिळणार आहे. उत्पादकांना मिळणार मोठा आधारबायोगॅस खरेदीची सरकारी हमी निश्चित व स्थिर दराची व्यवस्था नवीन प्रकल्पांसाठी भांडवली अनुदानगॅस वाहतुकीसाठी पाइपलाइन नेटवर्कएमएसएमई व उद्योजकांना सुलभ कर्ज आणि कर्ज हमीजिल्हास्तरावर विशेष प्रोत्साहन निधीखासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन

### कर सुधारणा विधेयक लोकसभेत मंजूर

करण्यात आली आहे. तसेच हे विधेयक प्राप्तिकर (दुरुस्ती) कायदा २०२५ आणि वित्त कायदा (दुरुस्ती) करण्याचेही प्रस्तावित आहे.

सरकार या विधेयकाद्वारे विदेशी गुंतवणुकीला आकर्षित करणे, 'मेक इन इंडिया'ला मजबूत करणे; यासोबतच 'ईज ऑफ डुइंग बिझनेस'ला पुढे नेण्याची मोठी योजना तयार करत आहे. वैश्विक परिस्थिती, जागतिक व्यापार आणि पुरवठा यंत्रणेत बदल होत असून, भारताच्या अनेक क्षेत्रांना गुंतवणूक आणि पाठबळाची गरज आहे. या विधेयकामुळं थेट तुमच्या प्राप्तिकरात कोणताही बदल होणार नाही. पण आगामी काळात या विधेयकाचा परिणाम दिसून येऊ शकतो, असे सांगण्यात येत आहे. विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी या विधेयकात महत्वाच्या तरतुदी आहेत, त्यामुळे गुंतवणूक आणि उद्योगासोबतच रोजगाराच्या नवीन संधींवर चांगला परिणाम होऊ शकेल. फॉरेन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर्सना गव्हर्नमेंट सिक्युरिटीजमधील गुंतवणुकीतून मिळणाऱ्या व्याजाच्या उत्पन्नावर आणि कॅपिटल गेनवर टॅक्स सूट मिळू शकेल. त्यामुळे भारतात आणखी विदेशी गुंतवणूकदार आकर्षित होऊन गुंतवणूक वाढण्यास मदत होऊन अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यूपीआय पेमेंटवर वाढीव शुल्क? या विधेयकात यूपीआय पेमेंटशी संबंधित मोठे बदल होऊ शकतात. पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम कायदा, २००७ च्या सेक्शन १० ए मध्ये बदलाची तरतूद आहे. त्यानंतर यूपीआय पेमेंट, डिजिटल पेमेंट, रूपे कार्डद्वारे होणाऱ्या पेमेंटवर झिरो एमडीआरची मर्यादा संपू शकते. म्हणजेच अधिकच्या यूपीआय पेमेंटवर शुल्क लागू शकतो, असे सूत्रांकडून सांगितले जात आहे. दरम्यान, हे किती रुपयांच्या व्यवहारावर किंवा कोणत्या प्रकारच्या व्यवहारावर शुल्क आकारले जाईल, हे सरकार निश्चित करणार आहे, असेही सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

### मराठ्यांचे 'पानिपत' करण्याचा सरकारचा कट

म्हणाले, सरकार मराठा समाजाचे नुकसान करण्यासाठी जाणीवपूर्वक भूमिका घेत आहे. अनेक लोकप्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर हा कट स्पष्ट झाला आहे. सरकार मराठ्यांना संपविण्याचे राजकारण करत असून त्याला मराठा समाज चोख प्रत्युत्तर देईल, असा दावा त्यांनी केला. तीन वर्षांत प्रथमच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर थेट निशाणा साधताना त्यांनी शिंदे डबल गेम खेळत असल्याचा आरोप केला. मराठा समाजाच्या पाठिंब्यामुळे सत्ता मिळाल्यानंतर आता त्याच समाजाविरोधात कारस्थान रचले जात असल्याचे ते म्हणाले. तसेच संजय शिरसाट, अतुल सावे, प्रसाद लाड, आशिष शेलार आणि राधाकृष्ण विखे पाटील यांचाही त्यांनी नावानिशी उल्लेख करत सरकारमधील काही नेते मराठा समाजाविरोधात काम करत असल्याचा आरोप केला. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही त्यांनी थेट आरोप करत, कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यामागे बावनकुळे आहेत. त्यांची नार्को टेस्ट करा, अशी मागणी केली. ज्योती दहीहंडे प्रकरणाचा संदर्भ देत शिंदे समितीच्या नोंदींचाही उल्लेख त्यांनी केला.मराठा समाजाला त्यांनी आवाहन करत, जातवैधता मिळाल्याशिवाय कोणत्याही निवडणुकीला उभे राहू नका, असे सांगितले. तसेच सरकार म राठा समाजाला राजकीयदृष्ट्या कमकुवत करण्याचा प्रयत्न करत असल्याचा पुनरुच्चार करून आगामी निवडणुकांमध्ये त्याचे परिणाम सरकारला भोगावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला.

# शिर्डी विमानतळाजवळ साकारणार १०० खोल्यांचे पंचतारांकित हॉटेल,

## काकडी गावचा होणार कायापालट

**अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी:** जगभरातून साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येणाऱ्या भाविकांसाठी आणि व्यावसायिक प्रवाशांसाठी एक अतिशय आनंदाची बातमी आहे. वाढती प्रवासी संख्या आणि त्यांच्या सोयीसुविधांचा विचार करून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात १०० खोल्यांचे भव्य पंचतारांकित हॉटेल उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी नुकत्याच निविदा मागवण्यात आल्या असून, हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर विमानतळ परिसराचा चेहरामोहराच बदलून जाणार आहे.

शिर्डीमध्ये दररोज सुमारे एक लाख, तर वीकेंडला आणि सुट्ट्यांच्या दिवशी दीड लाखांपर्यंत भाविक दर्शनासाठी येतात. भाविकांची ही वाढती गर्दी आणि विमानाने प्रवास करणाऱ्यांची वाढलेली संख्या लक्षात घेऊन विमानतळ परिसरातील आदरातिथ्य (हॉस्पिटॅलिटी) सुविधांना चालना देण्याचे प्रशासनाचे उद्दिष्ट आहे. याच पार्श्वभूमीवर उच्च दर्जाची निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी विमानतळ परिसरातील प्लॉट क्र. ३ आणि ४ वरील तब्बल १४,९७३ चौरस मीटर जागेवर हे पंचतारांकित हॉटेल साकारले जाणार आहे. संबंधित विकासकाला ही जागा ४९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर (लीज) दिली जाणार आहे.

या पंचतारांकित हॉटेलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधांनी युक्त अशा १०० आलिशान खोल्या असणार आहेत. विशेष म्हणजे, शिर्डीत येणाऱ्या साई भक्तांना आध्यात्मिक शांतता आणि विश्रांती मिळावी, या उद्देशाने येथे एक स्वतंत्र 'वेलनेस आणि योग केंद्र' उभारले जाणार आहे. याशिवाय व्यावसायिक बैठका आणि कॉर्पोरेट प्रवाशांच्या सोयीसाठी आधुनिक बिझनेस सेंटर, कॉन्फरन्स हॉल, अत्याधुनिक व्यायामशाळा तसेच जागतिक दर्जाचे रेस्टॉरंट्स आणि कॅफे आदी अद्ययावत सुविधा या एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जातील.

हा प्रकल्प केवळ निवासव्यवस्थेपुरता मर्यादित नसून, यामुळे मोठी आर्थिक उलाढाल आणि प्रादेशिक विकास साधला जाणार आहे. या हॉटेल आणि विमानतळाच्या विस्तारामुळे शिर्डीसह आसपासच्या अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. तसेच, शिर्डी विमानतळ हे आता केवळ धार्मिक पर्यटनापुरते मर्यादित न राहता, भविष्यात महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे 'लॉजिस्टिक आणि बिझनेस हब' म्हणून वेगाने उदयास येत आहे.




पुढील ४ वर्षांत हा प्रकल्प पूर्णत्वास जाण्याची अपेक्षा असून, शिर्डी विमानतळ परिसर हा शिर्डी शहराइतकाच भव्य आणि आधुनिक 'हॉस्पिटॅलिटी' केंद्र म्हणून नावारूपाला येईल. याचा थेट फायदा विमानाने येणाऱ्या लाखो साई भक्तांना आणि पर्यटकांना होणार आहे . यामुळे या परिसराचा थांबलेला विकासाला चालना मिळणार असून भविष्यात येथे कायापालट होणार आहे.

## केंद्रीय मंत्री कमलेश पासवान यांची दिल्लीत आ. लंघे यांनी घेतली भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण रस्ते विकासाला गती देण्यासाठी आमदार विठ्ठलराव लंघे यांनी दिल्ली येथे माननीय केंद्रीय राज्य ग्रामीण विकास मंत्री कमलेश पासवान यांची भेट घेऊन प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत विविध विकास प्रस्तावांवर सविस्तर चर्चा केली.

यावेळी झालेल्या भेटीप्रसंगी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना खासदार भाऊसाहेब वाकचौरे, संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आ. अमोल खताळ उपस्थित होते. ग्रामीण भागातील रस्ते अधिक दर्जेदार, सुरक्षित आणि सर्व ऋतूंमध्ये वाहतुकीस सक्षम व्हावेत यासाठी आवश्यक विकास कामांना गती देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

नेवासा विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गाव विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडले जावे आणि ग्रामीण भागाला सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी माझा सातत्यपूर्ण पाठपुरावा पुढे ही अविरत सुरू राहणार असल्याचे आ. विठ्ठल लंघे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.



## नियमित कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाखांचे प्रोत्साहन द्यावे, तहसीलदारांना निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेत नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याचा आरोप करत शिरेगाव ता. नेवासा येथील शेतकऱ्यांनी गुरुवारी नेवासा तहसीलदार डॉ. संजय बिराजदार यांना निवेदन दिले.



शेतकऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे की, सन २०१७ व २०१९ च्या कर्जमाफीत बोटावर मोजण्याइतक्या शेतकऱ्यांनाच लाभ मिळाला. त्यांना केवळ पन्नास हजार रुपयांचे तुटपुंजे अनुदान देण्यात आले. मात्र नियमित कर्ज भरणारा शेतकरी हा सोने-नाणे गहाण ठेवून देखील वेळेवर कर्ज फेडण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन म्हणून किमान दोन लाख रुपये देण्यात यावेत अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी नानासाहेब जाधव,रंगनाथ होन, गंगाधर जाधव, अविनाश जाधव आदी शेतकरी उपस्थित होते.

## शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सतीश भारस्कर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील देवगड- मुरमे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आले. यावेळी समितीच्या अध्यक्षपदी सतीश अशोक भारस्कर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तर आदिनाथ सोपान साबळे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

यावेळी शिक्षणतज्ज्ञ म्हणून विजय देविचंद चरवंडे, ग्रामपंचायत सदस्य अजय दामोदर साबळे यांच्यासह एकूण अकरा सदस्यांची शालेय व्यवस्थापन समितीवर निवड करण्यात आली. समितीचे सचिव म्हणून आदर्श शिक्षक सुभाष चव्हाण हे कार्यभार सांभाळणार आहेत.

नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व सदस्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या हितासाठी समिती सकारात्मक पावले उचलेल, अशी अपेक्षाही ग्रामस्थांनी व्यक्त केली.



## शेततळ्यात बुडून दोन तरुण शेतकऱ्यांचा मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील बाहदराबाद येथे बुधवारी सकाळी शेततळ्यात बुडून दोन तरुण शेतकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे. दीपक रामचंद्र पाचोरे (वय ३३) व प्रशांत गीतराम पाचोरे (वय ३४) अशी मृतांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दोघेही शेतातील पिकांवर औषध फवारणीसाठी शेततळ्यातून पाणी घेण्यास गेले होते. यावेळी दीपक पाचोरे यांचा तोल जाऊन ते पाण्यात पडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यांना वाचविण्यासाठी प्रशांत पाचोरे यांनी शेततळ्यात उडी घेतली; मात्र दोघेही पाण्यात बुडाले.

बराच वेळ दोघे घरी न परतल्याने प्रशांत यांच्या पत्नी शेतात गेल्या असता शेततळ्याजवळ फवारणीचा पंप व साहित्य पडलेले दिसले. त्यांनी आरडाओरड केल्यानंतर ग्रामस्थांनी शोधमोहीम सुरू केली. प्रशांत यांना बाहेर काढून रुग्णालयात नेण्यात आले, तर दीपक यांचा शोध घेण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन पथकाला पाचारण करण्यात आले. तळ्याचा बांध फोडून पाणी कमी केल्यानंतर त्यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दोघांनाही मृत घोषित केले.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून शेततळ्यांभोवती आवश्यक सुरक्षाव्यवस्था उभारण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

## शिक्षक सेनेच्या मागणीनुसार ऐनवेळी सर्व रिक्त पदे खुली अतिरिक्त शिक्षकांची समायोजन प्रक्रिया यशस्वी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गंगापूर तालुक्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेस आज सकाळी ११.०० वाजता सुरुवात झाली. प्रशासनाने प्रारंभी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या यादीत मुख्याध्यापकांची रिक्त पदे समाविष्ट करण्यात आलेली नव्हती. यावर महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेत्तर सेनेच्या वतीने तात्काळ आक्षेप नोंदविण्यात आला.

या पार्श्वभूमीवर शिक्षक सेनेच्या शिष्टमंडळाने मा. सभापती सौ. कविताताई चव्हाण, मा. उपसभापती श्री. राजेश्वर हिवाळे, मा. माजी सभापती तथा विद्यमान पंचायत समिती सदस्य श्री. लक्ष्मणभाऊ सांगळे, पंचायत समिती सदस्य श्री. पाखरे साहेब तसेच श्री. रविंद्रभाऊ चव्हाण यांची भेट घेऊन सर्व रिक्त पदे समायोजनासाठी खुली करण्याची मागणी केली.

शिक्षक सेनेच्या मागणीची दखल घेत मा. सभापती व मा. उपसभापती यांनी प्रशासनाला सर्व रिक्त पदे समायोजनासाठी खुली करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सर्व रिक्त पदांची माहिती पारदर्शकपणे उपलब्ध करून देण्यात आली.आजच्या समायोजन प्रक्रियेत ६ पदवीधर शिक्षकांचे समायोजन करण्यात आले,तर २७ प्राथमिक शिक्षकांचे पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापक पदावर तात्पुरते समायोजन करण्यात आले.

यामुळे अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया कोणताही संभ्रम न राहता पूर्णतः पारदर्शक, न्याय्य आणि यशस्वीरीत्या पार पडली.

याबद्दल मा. गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे, गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे, शिक्षण विस्तार अधिकारी अनिलकुमार सकदेव,विजय दुतोंडे तसेच कनिष्ठ सहाय्यक करण मोहिते यांचे शिक्षक सेनेच्या वतीने मनः पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

तसेच सभापती, उपसभापती व सर्व पंचायत समिती सदस्यांचे शिक्षकांच्या हिताचा निर्णय घेतल्याबद्दल शिक्षकसेनेचे मराठवाडा उपाध्यक्ष अनिल काळे, जिल्हा सरचिटणीस भगवान हिवाळे, तालुकाध्यक्ष राजेंद्र बोल्डे, तालुका संपर्कप्रमुख कैलास गायके, तालुका सरचिटणीस सचिन साळुंके, कार्याध्यक्ष निलेश कहाटे, तालुका उपाध्यक्ष भास्कर आढाव, तालुका प्रसिद्धीप्रमुख जावेद पटेल, साईनाथ जानराव, सचिन पाठक, ज्ञानेश्वर पवार, पांडुरंग खेडकर यांचेसह शिक्षकांनी विशेष आभार मानले..

## शिर्डी नगरपरिषदेने चर्मकार समाजाला स्टॉल द्यावेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :**चर्मकार समाजातील बांधवांना शिर्डी शहरात सन्मानाने आणि सुरळीतपणे व्यवसाय करू देण्याबाबत समाजाच्या वतीने नुकतेच नगरपरिषदेला निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून नगराध्यक्षा व उपनगराध्यक्ष यांनी समाजाच्या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले . या प्रसंगी समाज बांधवांनी सांगितले की, ''आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, शिर्डी नगरपरिषद आमच्या या रास्त मागणीवर लवकरात लवकर योग्य ती प्रशासकीय आणि धोरणात्मक कारवाई करून समाजाला न्याय मिळवून देईल. आम्हाला सन्मानाने व्यवसाय करण्याची संधी मिळावी .

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAMESHE KARIM SHAIKH SUBHAN TO MY NEW NAMS AS KARIM SUBHAN KAKAR (ADHAR NO.4539 2358 3370 FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC,SHRIRAMPUR DATE:-06/08/2026 PALCE:-SHRIRAMPUR

# लोकाभिमुख योजनामुळे एसटी महामंडळ प्रगती करीत आहे : ना.विखे पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बससेवेने सर्वसामान्य व गोरगरीब जनतेला नेहमीच आधार दिला असून, ग्रामीण भागातील वाहतुकीचे प्रमुख साधन म्हणून बसची ओळख आहे. राज्य शासनाच्या लोकाभिमुख योजनांमुळे एसटी महामंडळ नव्या उमेदीने प्रगती करीत असल्याचे प्रतिपादन जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागाच्या अंतर्गत लोणी येथील बस स्थानकाच्या पायाभूत सुविधांच्या कामांचा शुभारंभ मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील होते.यावेळी ट्रक वाहतूक संस्थेचे अध्यक्ष नंदूशेठ राठी, अशोकराव धावणे, बापूसाहेब आहेर, किसनराव विखे, संगमनेर आगार प्रमुख निलेश बटकुळे, लोणी बस स्थानकाचे प्रमुख रावसाहेब पर्वत, आणि ग्रामस्थ उपस्थित होते.या कामास महायुती सरकारने बस स्थानकाच्या कामाकरीता सुमारे २कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

ना. विखे पाटील म्हणाले की, २०१० मध्ये 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' (इजढ) तत्त्वावर अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वप्रथम लोणी येथे आधुनिक बस स्थानकाची उभारणी करण्यात आली. स्व.बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीतून बस स्थानकाचे काम करण्यात आले.तत्कालीन परिवहन महामंडळाचे अध्यक्ष स्वर्गीय सुधाकर परिचारक यांच्या मार्गदर्शनाने हा प्रकल्प पूर्णत्वास गेला होता.




आज हे बसस्थानक स्वच्छता, सुरक्षितता आणि उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे राज्यासाठी आदर्श ठरत असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की, राज्य शासनाने राबविलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांमुळे एसटी महामंडळाची आर्थिक व सेवा क्षमता वाढत आहे. कोविड काळात बंद झालेल्या बस फेऱ्यांचा आढावा घेऊन प्रवाशांच्या गरजेनुसार त्या पुन्हा सुरू करण्याबाबत संगमनेर आगाराने पुन्हा नियोजन करावे, बसस्थानक परीसराची पाहणी करून भविष्यात अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आरखडा तयार करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या.माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी लोणी गावाच्या विकासात बसस्थानकाचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. ग्रामपंचायतीला मिळालेल्या विविध राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये बसस्थानकाच्या स्वच्छ व आदर्श व्यवस्थापनाचा मोठा सहभाग राहिला असून, नव्याने होणाऱ्या विकासकामांमुळे बसस्थानक अधिक आकर्षक आणि प्रवासीस्नेही होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.प्रास्तावि ात बसस्थानक प्रमुख रावसाहेब पर्वत यांनी बसस्थानका मार्फत राबविण्यात येणारे विविध उपक्रम व नव्या विकासकामांची माहिती दिली, निलेश बटकुळे यांनी आभार मानले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि .७ ऑगस्ट २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १९०<br>२८०<br>२२६ | ०-३ | १२०<br>३४६<br>४४८ | जोड<br>०६-४३-१८-७९-३६ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>६९०<br>२४९ | ५-१ | १४६<br>४७०<br>११९ | जोड<br>५९-२१-३०-६४-१८ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९<br>२७८<br>२२३ | ७-६ | १२३<br>२४०<br>२२२ | जोड<br>७०-३६-१४-२५-६९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 8 | | | |

# द • ख • ल

## मुळा धरणातील अतिरिक्त पाणी उजव्या कालव्यातून सोडा : वाणी



**ढोरजळगांव :** मुळा धरणात समाधानकारक पाणीसाठा असताना मुळा उजव्या कालव्याच्या टेल भागातील पाथर्डी व शेवगाव तालुक्यात अद्याप अपेक्षित पाऊस झालेला नाही. त्यामुळे खरीप पिकांना पाण्याची तीव्र गरज निर्माण झाली असून, मुळा उजव्या कालव्यास विशेष आवर्तनाद्वारे अतिरिक्त पाणी सोडावे, अशी मागणी खरेदी विक्री संघाचे माजी संचालक राजेंद्र वाणी यांनी केली आहे. यंदा पावसाने खंड दिल्याने ऊस, सोयाबीन, कापूस, मका, बाजरी, तूर आदी खरीप पिकांवर परिणाम झाला आहे. या टप्प्यावर पिकांना दिलासा मिळेल या आवर्तनाचा ढोरजळगांवने, गरडवाडी, आपेगाव आखतवाडे,आव्हाणे ,ब-हाणपुर, मळेगांव येथील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. या भागात कमी पर्जन्यमानामुळे पिकांची वाढ मंदावली असून दोन महिने उलटुनही या परीसरात अजुन दमदार पाऊस झालेला नाही त्यामुळे शेतकरी राजा चिंतेत आहेत. मुळा धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध आहे. टेलच्या भागातील शेतकऱ्यांना सध्या पिकांसाठी पाटपाण्याची नितांत गरज असून, विशेष आवर्तनातून अतिरिक्त पाणी सोडल्यास खरीप पिकांना मोठा दिलासा मिळणार असुन पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी वाणी यांनी केली आहे.

## गजानन विद्यालयात व्यसनमुक्तीवर व्याख्यान



**ढोरजळगांव :** श्री गजानन माध्य व उच्च माध्य विद्यालयात नशा मुक्त युवा –विकसित भारत संकल्प अभियान अंतर्गत व्यसनमुक्ती या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंजुश्री बहेनजी, प्रा अशोक नरवडे, उषा नरवडे, घुले सर, प्रा. रमेश लांडे आदी उपस्थित होते. यावेळी ब्रम्हकुमारी मंजुश्री बहेनजी म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी व्यसनापासून परावृत्त होऊन चांगले छंद जोपासण्याचे आव्हान केले.व्यसनामुळे शरीराचा नाश होतो.तसेच माणसाचे जीवन उद्ध्वस्त होते. तसेच व्यसनापासून परावृत्त होऊन त्यांची सुरुवात स्वतः पासून, आपल्या कुटुंबापासून केली पाहिजे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप झाडे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा.योगेश नरवडे यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

## गव्हाणे महाराज मंदिरासाठी मायंजीबाबा देवस्थानकडून मदत



**करंजी :** अहिल्यानगर व बीड जिल्ह्याच्या हद्दीत असलेल्या व करंजी घाटातील गव्हाणे बाबा हे जागृत देवस्थानचा सध्या जीर्णोद्धारा चे काम चालू आहे त्या साठी परिसरातील धार्मिक अधिष्ठान असलेल्या मायंजी बाबा देवस्थानने एकावन्न हजार रुपये निधी देऊन दिला आहे. गव्हाणे बाबा देवस्थानचे मठाधिपती ज्ञानेश्वर माऊली कराळे यांनी यावेळी हा धनादेश स्वीकारला. मायंजी बाबा देवस्थान गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक कामामध्ये अग्रेसर असते.परिसरातील अनेक कामात त्यांनी सढळ हाताने मदत केलेली असून यापूर्वी या देवस्थाने हनुमान मंदिर जिर्णोद्धार, राम मंदिर जीर्णोद्धार ,भ्योन्याई माता जीर्णोद्धार, उत्तरेश्वर मंदिर विकास कामे तसेच रामगड व उत्तरेश्वर देवस्थान मार्फत जाणाऱ्या पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडी सोहळ्यासहित वेळोवेळी आर्थिक मदत केलेली आहे. यावेळी बाबा देवस्थानच्या सर्व सदस्यांचा आ. अक्षय कर्डिले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी गंगा भाकरे, सुभाष अकोलकर, संभाजी अकोलकर, रघु भावले, बापू आरोळे, शफीक शेख , मारुती क्षेत्रे, बंडू अकोलकर, बाळासाहेब सोनाजी अकोलकर आदी उपस्थित होते.

## श्रीगोंदा भूमिअभिलेख कार्यालयाला 'वाली' कोण?; कायमस्वरूपी कार्यालयप्रमुखच नाही

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा भूमिअभिलेख कार्यालयातील प्रशासनाचा कारभार सध्या अक्षरशः वाऱ्यावर असल्याचे चित्र आहे. अनेक दिवसांपासून कार्यालयाला कायमस्वरूपी कार्यालय प्रमुख मिळालेला नसल्याने नागरिकांची शेकडो कामे प्रलंबित पडली आहेत. त्यातच प्रभारी अधिकाऱ्याचीही प्रभावी व्यवस्था नसल्याने कार्यालयीन कामकाजाचा बोजवारा उडाला आहे. फेरफार, मोजणी, नकाशे, ७/१२ संदर्भातील तांत्रिक कामे तसेच इतर महत्त्वाची प्रकरणे वेळेत होत नसल्याने नागरिकांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. अनेकदा संबंधित अधिकारी उपलब्ध नसल्याने नागरिकांची निराशा होत असून, शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि वकिलांमध्ये तीव्र नाराजी आहे. भूमिअभिलेखसारख्या महत्त्वाच्या कार्यालयाला कायमस्वरूपी प्रमुख नसणे ही गंभीर बाब मानली जात आहे. त्यामुळे कार्यालयाच्या कामकाजावर देखरेख कोणाची, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने कायमस्वरूपी कार्यालय प्रमुखाची नियुक्ती करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, अन्यथा नागरिकांच्या संतापाला सामोरे जावे लागेल, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## ७ ऑगस्टपासून युवाशक्ती करंडक क्रिकेट स्पर्धा

**शेवगाव :** ग्रामीण भागातील शिक्षण आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या गणेशनगर येथील कॅम्पसचे 'डॉ. त्रिंबकराव पुरनाळे कॅम्पस असे नामकरण येत्या शुक्रवारी ७ ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे. याच दिवशी शेवगाव-पाथर्डी तालुकास्तरीय 'युवाशक्ती करंडक'



क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटनही होणार असून या दुहेरी सोहळ्याबाबत तालुक्यात उत्साहाचे वातावरण आहे. वारसा मैत्रीच्या नात्याचा, वारसा नव्या पिढीतील विश्वासाचा... या ब्रीदवाक्याला साजेशा या कार्यक्रमास महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य आमदार विवेक कोल्हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे असतील. ग्रामीण भागातील युवा खेळाडूंना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ७ ते ११ ऑगस्ट दरम्यान 'युवाशक्ती करंडक' क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेत्या संघाला ३१ हजार, उपविजेत्याला २१ हजार, तृतीय क्रमांकासाठी १५ हजार आणि चतुर्थ क्रमांकासाठी ११ हजार रोख पारितोषिकासह आकर्षक चषक प्रदान करण्यात येणार आहे.

# तरुणांनी व्यसनापासून दूर रहावे : डॉ. विखे पा.

### व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा : प्रा.राम शिंदे

### अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर :** आजचा तरुण हा देशाच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार आहे. तरुणांनी कोणत्याही परिस्थितीत व्यसनाच्या आहारी जाऊ नये, तसेच व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्या व्यक्तींना त्यापासून परावृत्त करून व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन केले विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी केले.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'नशामुक्त भारत' या संकल्पनेचा उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात जनजागृतीला चालना दिली जात असल्याचे सांगितले. तरुणांनी व्यसनापासून दूर राहून आपले भविष्य घडवावे, असे आवाहन करत जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने राबविलेल्या या जनजागृती अभियानाचे त्यांनी कौतुक केले.

अहिल्यानगर जिल्हा पोलिस दलातर्फे अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान राबविण्यात आले होते. ' एक निर्धार, एक संकल्प, एक भविष्य 'व्यसनमुक्ती जिल्ह्याच्या दिशेने एक सामूहिक पाऊल या संकल्पनेवर आधारित या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने शहरात व्यसनमुक्त रॅली काढण्यात आली. यावेळी शहरातील अनेक शाळा, महाविद्यालयांनी या रॅलीमध्ये सहभाग नोंदविला.

यावेळी आ. विक्रमसिंह पाचपुते, आ. काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक मुम्मक्का सुदर्शन, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. विक्रम पाचपुते म्हणाले की, पोलिस अधीक्षक कार्यालयातर्फे या अभियानाचे खूप चांगल्या प्रकारे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानामुळे नागरिकांमध्ये व्यसनमुक्ती बाबत जनजागृती निर्माण होणार आहे. तरुणांनी देखील व्यसनाकडे न वळता भविष्याकडे लक्ष द्यावे असेही ते म्हणाले.

आ. दाते म्हणाले की, व्यसन हे आपल्या समाजाला लागलेली किड आहे. आपल्या देशातील तरुणांनी व्यसनाकडे वळू नये. आपले ध्येय निश्चित करून त्या दिशेने तरुणांनी मार्गक्रमण करावे. तरुणांनी व्यसनमुक्तीच्या दिशेने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन म्हणाले की, व्यसनमुक्त समाजासाठी आजच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरुण आपल्या देशाचे भविष्य आहे. आपले भविष्य नशामुक्त राहणे गरजेचे आहे. ' नशामुक्त भारताचे' स्वप्न आपल्याला पूर्ण करायचे आहे असेही ते म्हणाले. तरुणांनी समाज माध्यमाचा उपयोग केवळ आपल्या विकासासाठी करावा. समाज माध्यम हाताळताना देखील खबरदारी घ्यावी असेही ते म्हणाले.

या अभियानांतर्गत शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीत विद्यार्थी, युवक, स्वयंसेवी संस्था, विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# तिसरीचा वर्ग गळक्या छताखाली!

दादासाहेब सोनवणे
राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहरातील सिद्धार्थनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आजही अत्यंत गैरसोयीच्या आणि धोकादायक परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागत आहे. तिसरीचा वर्ग गळक्या छताखाली भरत असल्याने पावसाळ्यात विद्यार्थ्यांचे शिक्षण अक्षरशः पाण्यात जात असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेला अनेक वर्षांपासून स्वतंत्र अंगणवाडीची इमारत नसल्याने अंगणवाडी व वर्गखोल्यांची तात्पुरती व्यवस्था विविध ठिकाणी करण्यात येत आहे. पूर्वी समाजमंदिराच्या किचन रूममध्ये अंगणवाडी भरविण्यात येत होती. ती इमारत जीर्ण झाल्यानंतर सध्या तिसरीचा वर्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनातील नव्याने बांधलेल्या किचन रूममध्ये भरविला जात आहे. मात्र या खोलीचे छत पावसाळ्यात गळत असल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वर्गात विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचचीही व्यवस्था नसल्याने चिमुकल्यांना जमिनीवर बसून शिक्षण घ्यावे लागत आहे.

**आमदारांकडे प्रस्ताव सादर**

१ मार्च २०२६ रोजी श्रीगोंदा तालुक्याचे आमदार विक्रम पाचपुते यांच्याकडे या शाळेसाठी नवीन वर्गखोल्यांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना अत्यंत गैरसोयीच्या परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सिद्धार्थनगर येथील या शाळेस स्वतंत्र अंगणवाडी, प्रयोगशाळा आणि तिसरीच्या वर्गासाठी अशा तीन खोल्या तातडीने मंजूर कराव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते आनंद घोडके यांनी केली आहे.

छतातून गळणाऱ्या पाण्यामुळे अध्यापनात वारंवार व्यत्यय येत असून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. परिस्थिती हाताळण्यासाठी संबंधित शिक्षकांनी स्वतः कागदी तळवट आणून पत्र्यावर टाकत तात्पुरती उपाययोजना केली. मात्र हा उपाय कायमस्वरूपी नसल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे.याशिवाय वर्गखोलीच्या एका कोपऱ्यातील भाग उखडलेल्या अवस्थेत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एखादी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण, असा सवाल पालक आणि स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शाळेस स्वतंत्र अंगणवाडी, प्रयोगशाळा आणि तिसरीच्या वर्गासाठी स्वतंत्र वर्गखोली अशा एकूण तीन नवीन खोल्या तातडीने मंजूर कराव्यात, अशी मागणी पालक व स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## प्रा. नष्टे यांचा मुख्याध्यापक संघातर्फे गौरव



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** राशीन येथील हशु आडवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य मा. राजेंद्र नष्टे सर यांचा कर्जत तालुका मुख्याध्यापक संघाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, विद्यार्थीहितासाठी केलेले सातत्यपूर्ण कार्य, उत्कृष्ट प्रशासकीय नेतृत्व आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत हा गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी श्री रोकडेश्वर माध्यमिक विद्यालय, नांदगावचे मुख्याध्यापक मा. महादेव सायकर सर, न्यू इंग्लिश स्कूलचे मा. राजेंद्र सोके सर तसेच मा. लालासाहेब शेलार सर यांच्या हस्ते प्राचार्य नष्टे सर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून नष्टे सर यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करत त्यांच्या विद्यार्थीकेंद्री कार्यपद्धतीचे आणि समर्पित नेतृत्वाचे भरभरून कौतुक केले. कार्यक्रमास कर्जत तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष मा. बाळासाहेब वाघ सर यांनी उपस्थित राहून प्राचार्य नष्टे सर यांचे अभिनंदन केले. त्यांनी नष्टे सर यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या मोलाच्या योगदानाचा गौरव केला. या कार्यक्रमास राजेंद्र सोके, लालासाहेब शेलार, विठ्ठल काळे यांच्यासह कर्जत तालुक्यातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकास आराखडा प्रसिद्धी आधीच 'आरक्षणांचा खेळ' सुरू?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहराच्या पुढील अनेक वर्षांच्या विकासाची दिशा ठरविणाऱ्या प्रारूप विकास आराखड्यावरून अहिल्यानगर महानगरपालिकेत वाद निर्माण झाला आहे. दि. ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. २३ अंतर्गत प्रारूप विकास योजना प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. मात्र संपूर्ण विकास आराखडा, अधिकृत नकाशे आणि आवश्यक तांत्रिक अभिलेख नगरसेवकांना उपलब्ध करून न देता प्रस्ताव मंजूर केल्याचा आरोप शिवसेनेचे नगरसेवक तथा गटनेते दत्तात्रय हरिभाऊ कावरे यांनी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी कावरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री आणि नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे. कावरे यांच्या म्हणण्यानुसार, विकास आराखडा हा केवळ प्रशासकीय दस्तऐवज नसून शहरातील जमीन वापर, निवासी व व्यावसायिक क्षेत्रे, सार्वजनिक आरक्षणे, रस्ते, उद्याने, शाळा, रुग्णालये, बाजारपेठा, नदी-नाले, वाहतूक व्यवस्था तसेच नागरिकांच्या मालमत्तांवर दूरगामी परिणाम करणारी बाब आहे. त्यामुळे अशा महत्त्वपूर्ण प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी नगरसेवकांना संपूर्ण आराखड्याचा अभ्यास करण्याची पुरेशी संधी मिळणे आवश्यक होते. तीन पानांत शहराचा विकास आराखडा? सभेपूर्वी नगरसेवकांना संपूर्ण प्रारूप योजना, अधिकृत जमीन वापर नकाशे, आरक्षणनिहाय माहिती, नवीन आरक्षणे, बदललेली अथवा वगळण्यात आलेली आरक्षणे, प्रस्तावित रस्ते, सर्वेक्षण आणि तांत्रिक अहवाल उपलब्ध करून देण्यात आले नसल्याचे कावरे यांनी म्हटले आहे.

उलट सभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर केवळ तीन पानी संक्षिप्त माहितीपत्रक देण्यात आले. त्या माहितीपत्रकावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी, दिनांक, जावक क्रमांक किंवा प्रमाणितीही नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

'आरक्षण काढून देतो'च्या चर्चेमुळे संशय

कावरे यांनी निवेदनात आणखी गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. प्रारूप विकास योजना अधिकृतरीत्या प्रसिद्ध होण्यापूर्वीच काही नगरसेवक अथवा त्यांच्याशी संबंधित मध्यस्थ जमीनधारक आणि विकासकांना भेटून जमिनीवरील आरक्षण काढून देतो, बदलून देतो किंवा अनुकूल जमीन वापर करून देतो अशा स्वरूपाची आश्वासने देत असल्याच्या तक्रारी निदर्शनास आल्याचे त्यांनी म्हटले आहे. या आरोपांची सत्यता स्वतंत्र चौकशीतून पडताळण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे. संपूर्ण आराखडा नगरसेवकांनाही उपलब्ध झाला नसताना प्रस्तावित आरक्षणांची माहिती निवडक व्यक्तींना आधीच कशी मिळाली, अप्रकाशित माहिती बाहेर गेली का आणि त्यामागे कोणते आर्थिक अथवा खासगी हितसंबंध आहेत का, याचाही शोध घेण्याची मागणी करण्यात आली आहे. ठरावाच्या पुढील कार्यवाहीला स्थगिती द्या दि. ३० जुलैच्या ठरावाच्या आधारे होणाऱ्या पुढील कार्यवाहीला तात्पुरती स्थगिती द्यावी.

## ९ ऑगस्टचा उपवर्गीकरणविरोधी मोर्चा ठरल्याप्रमाणेच

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात येत्या ९ ऑगस्ट क्रांती दिनी आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय मोर्चा कोणत्याही परिस्थितीत ठरल्याप्रमाणेच पूर्ण ताकदीने काढण्यात येणार असल्याची माहिती स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्या वतीने देण्यात आली आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, काही सोशल मीडिया ग्रुपवर हा मोर्चा स्थगित झाल्याच्या खोडसाळ पोस्ट प्रसारित केल्या जात आहेत. मात्र, हा मोर्चा कोणत्याही एका व्यक्तीचा नसून संपूर्ण समाजाचा आहे आणि तो स्थगित करण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे समाजबांधवांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

संघटनेच्या मते, ९ ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून दिवंगत ज्येष्ठ नेते अशोकराव गायकवाड यांनी या मोर्चाचे नियोजन केले होते. त्यामुळे त्यांच्याच संकल्पानुसार ९ ऑगस्ट रोजी मोर्चा काढणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा मोर्चा कोणत्याही समाजाच्या विरोधात नसून अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाच्या निर्णयाला कारणीभूत ठरलेल्या भाजप-आरएसएसच्या धोरणांच्या विरोधात आहे. अनुसूचित जाती समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. तसेच अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन विद्यमान १३ टक्के आरक्षण वाढवून २५ टक्के करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी या मोर्चातून करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, कापड बाजार परिसरात रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे मोर्चाच्या पारंपरिक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, माळीवाडा, महात्मा फुले पुतळा, अशा टॉकीज चौक, माणिक चौक, अर्बन बँक, नवी पेठ, चितळे रोड, दिल्ली गेट मार्गे नीलक्रांती चौक येथे समारोप होणार आहे.

या मोर्चामध्ये लाँग मार्चचे प्रणेते आयु. सिद्धार्थ शिंगारे, भीम टायगरचे राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब शेळके, राजूभाऊ थाटे, सिद्धार्थ दादा सुरडकर यांच्यासह विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. शहर व जिल्ह्यातील सर्व भीमसैनिक, आंबेडकरी अनुयायी आणि बौद्ध समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अल्पसंख्याकांच्या विकासासाठी खा. लंके आक्रमक

### सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी केंद्राकडे प्रस्ताव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते, कौशल्य विकास आणि इतर मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी पंतप्रधान जन विकास कार्यक्रम अंतर्गत विविध विकासकामांना तातडीने मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

खा. लंके यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, लोकसभा मतदारसंघातील अनेक अल्पसंख्याक बहुल वस्त्या आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून काही प्रमाणात दूर आहेत. या भागांमध्ये शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, अंगणवाडी, सामुदायिक सुविधा आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण केंद्रांचा अभाव असल्याने नागरिकांना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर, युवकांच्या रोजगाराच्या संधींवर आणि महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणावर होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

पीएमजेव्हीके ही केंद्र सरकारची महत्त्वाची योजना असून अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्यासाठी ही योजना प्रभावी माध्यम ठरू शकते. त्यामुळे या योजनेअंतर्गत मतदारसंघातील प्राधान्याच्या विकासकामांचा समावेश करून त्यांना तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

निवेदनामध्ये शाळांच्या नवीन इमारती, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वसतिगृहे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, कौशल्य विकास केंद्रे, सामुदायिक भवन, अंगणवाडी केंद्रे, पिण्याच्या पाण्याच्या योजना, स्वच्छता सुविधा, अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम, गटारे आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे. या सुविधा उभारल्यास नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास केंद्रांना विशेष प्राधान्य देण्याची आवश्यकता असल्याचेही खासदार लंके यांनी अधोरेखित केले आहे. उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण उपलब्ध झाल्यास अल्पसंख्याक समाजातील युवक-युवती स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करू शकतील, असे त्यांनी नमूद केले आहे.

शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात भक्कम पायाभूत सुविधा उभारणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी ग्रामीण आणि उपेक्षित भागांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



अल्पसंख्याक समाजाचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून सामाजिक समावेशन, शैक्षणिक प्रगती, आर्थिक स्वावलंबन आणि जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांचा समन्वय साधणे गरजेचे असल्याचे खा. लंके यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

# चाकण एमआयडीसीतील रस्ते २५ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करा

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे निर्देश; अतिक्रमणे हटविण्यासाठी महिन्याची मुदत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** चाकण एमआयडीसी परिसरातील राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांच्या अखत्यारीतील सर्व रस्ते २५ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

चाकण परिसरातील रस्त्यांवरील खड्डे, वाहतूक व्यवस्था, पावसाळ्यातील उपाययोजना तसेच नदी-नाल्यांवरील अतिक्रमणांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. या बैठकीत डुडी यांनी संबंधित विभागांना रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.चाकण परिसरातील नदी, नाले आणि सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणे संबंधितांनी एका महिन्याच्या आत स्वखर्चाने हटवावीत, असे आवाहन करण्यात आले. मुदतीनंतरही अतिक्रमणे कायम राहिल्यास प्रशासनाकडून ती हटविण्यात येतील. त्यासाठी होणारा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यासह नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. तळेगाव चौक, राणूबाईमळा, खराबवाडी, वाघजाई नगर-खराबवाडी रस्ता, म्हाळुंगे इंगळे, खालुंब्रे, शिंदे वासुली येथील चौक, आंबेठाण वाय कॉर्नर, कोरेगाव फाटा, बिरदवडी फाटा, दवने मळा ते द्वारका सिटी रस्ता तसेच कॉर्निंग कंपनी ते पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग या भागातील रस्त्यांची दुरवस्था बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आली. या ठिकाणी खड्डे बुजविणे, रस्त्यांच्या कडांची सुधारणा करणे आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. धोकादायक गतिरोधक काढून भारतीय रस्ते काँग्रेसच्या मानकांनुसार गतिरोधक उभारावेत. आवश्यक ठिकाणी दिशादर्शक फलक, रस्ता चिन्हे व परावर्तक पट्ट्या लावाव्यात. रस्त्यांवर होणाऱ्या अनधिकृत पार्किंगवर नियमानुसार कारवाई करावी, असेही निर्देश देण्यात आले. बैठकीस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता निलेश मोडवे, एमआयडीसीचे वरिष्ठ तांत्रिक सल्लागार संजयकुमार मांगीलवार, पीएमआरडीएचे अधिकारी शिवकुमार गोपाल, चाकण वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त गुलाब इनामदार आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता प्रवीण सुमंत यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई केली जाईल. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत रस्ते दुरुस्ती आणि अतिक्रमणांच्या प्रश्नावर दिरंगाई सहन केली जाणार नाही, असे डुडी यांनी स्पष्ट केले.

## मानक लेखन स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**वाघोली :** भारतीय जैन संघटना विद्यालयात भारतीय मानक ब्युरोच्या मानक क्लबच्या वतीने मानक लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत विद्यालयातील १०५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी लेखनकौशल्यासोबतच वस्तूंची गुणवत्ता, सुरक्षितता आणि प्रमाणित मानकांविषयीची जागरूकता व्यक्त केली.भारतीय मानक ब्युरोचा हा क्लब गेल्या चार वर्षांपासून विद्यालयात कार्यरत आहे. भारतीय वस्तूंच्या मानकांचा प्रचार व प्रसार करण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण व प्रमाणित वस्तूंच्या वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी क्लबच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकांक्षा करांडे व जानवी वाघ यांनी केले. प्रास्ताविक रेश्मा शितोळे यांनी केले. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या मानक गीताने कार्यक्रमात उत्साह निर्माण केला. संस्कृती वारघडे व ऋतुजा बोरसे यांनी मानक क्लबमधील अनुभव मनोगतातून व्यक्त केले.भारतीय मानक ब्युरोच्या प्रतिनिधी स्मिता शिंदे यांनी मानकांचे महत्त्व, दैनंदिन जीवनातील प्रमाणित वस्तूंची आवश्यकता आणि मानक क्लबची भूमिका याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेचे परीक्षण स्मिता शिंदे व रेश्मा शितोळे यांनी केले. स्पर्धेत प्रथम क्रमांक संस्कृती नितीन वारघडे व रिया मच्छिंद्र सहानी, द्वितीय क्रमांक श्रावणी परसराम कांडलकर व श्रावणी संतोष साखरे, तर तृतीय क्रमांक विक्रम विष्णू पवार व आयुष विजय टाके यांनी मिळविला. उत्तेजनार्थ पारितोषिक जुई संदीप संकपाळ व मानसी उमेश डुंबरे यांनी मिळविले. विद्यालयाचे प्राचार्य संतोष भंडारी व पर्यवेक्षक पांडुरंग पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रमाणित व गुणवत्तापूर्ण वस्तूंच्या वापराबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी मानक प्रतिज्ञा घेतली. वाडेकर यांनी आभार मानले.

## कडेठाणच्या जलजीवन योजनेसाठी १५ ऑगस्टला उपोषणाचा इशारा



**दौंड :** निधीअभावी आणि ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे गेल्या तीन वर्षांपासून रखडलेली जलजीवन मिशन योजनेची कामे तातडीने पूर्ण करून गावाला नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, या मागणीसाठी कडेठाण ग्रामस्थांनी १५ ऑगस्ट रोजी ग्राम पंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे शुद्ध व सुरक्षित पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जलजीवन मिशन योजना राबविण्यात येत आहे. कडेठाण गावासाठीही या योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपयांची कामे मंजूर करून जलकुंभ व पाइपलाइनचे काम करण्यात आले. मात्र, जलकुंभ उभारून तीन वर्षे उलटली तरी अद्याप नळाला पाणी आलेले नाही. त्यामुळे जलकुंभ शोभेची वस्तू ठरला असून, ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.निधीची कमतरता आणि ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे जलकुंभ व पाइपलाइनची कामे अर्धवट राहिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. योजना मंजूर होऊनही प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरू नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. वारंवार निवेदने देऊनही कामे पूर्ण होत नसल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाच्या भूमिकेबाबत संताप व्यक्त केला आहे.याप्रकरणी पंचायत समिती दौंड, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागीय अधिकारी यांना रुपाली विठ्ठल दिवेकर, विठ्ठल सुभाष दिवेकर व कडेठाण ग्रामस्थ यांच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. १५ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालय कडेठाण येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.गावातील जलजीवन योजनेची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करून नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, निधीची उपलब्धता करून द्यावी आणि ठेकेदाराकडून कामे वेळेत पूर्ण करून घ्यावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

## खामुंडी शाळेत 'गुड टच-बॅड टच' बाबत जनजागृती

**आळेफाटा :** मुलांची सुरक्षितता आणि आत्मसंरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी ओतूर पोलिसांच्या वतीने जुन्नर तालुक्यातील खामुंडी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये 'गुड टच-बॅड टच' विषयावर मार्गदर्शन सत्र घेण्यात आले.ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात पोलिस कर्मचारी मयुरी खोसे आणि आशिष जगताप यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पालक-शिक्षकांचा प्रेमळ स्पर्श, कौतुकाची थाप हा 'गुड टच', तर भीती, लाज किंवा अस्वस्थता निर्माण करणारा स्पर्श हा 'बॅड टच' असल्याचे विद्यार्थ्यांना उदाहरणांसह समजावून सांगण्यात आले.अयोग्य स्पर्श झाल्यास घाबरून किंवा लपून न राहता विश्वासातील मोठ्या व्यक्तीला तातडीने सांगावे तसेच आपत्कालीन परिस्थितीत ११२ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.पोलिस कर्मचारी मयुरी खोसे यांनी, आपल्या शरीरावर फक्त आपलाच अधिकार आहे. काही चुकीचे घडल्यास ते लपवू नका. मोठ्यांना सांगणे हेच खरे धैर्य आहे, असे सांगितले.यावेळी मुख्याध्यापक बाळू बांगर, शिक्षक संजय आहेर, सुवर्णा नांगरे, सुनीता वर्पे, विष्णू दाते, ज्ञानदेव कांबळे, सोनाली देशपांडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना हेल्पलाइन क्रमांकाची माहिती असलेली पत्रकेही देण्यात आली. ओतूर परिसरातील इतर जिल्हा परिषद शाळांमध्येही अशा प्रकारचे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी सांगितले. उपक्रमाबद्दल मुख्याध्यापक बाळू बांगर यांनी ओतूर पोलिसांचे आभार मानले.



## ओतूरमध्ये रोडरोमिओंवर वचक निर्भया पथक सक्रिय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**आळेफाटा :** विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत निर्भया पथक सक्रिय झाले आहे. शाळा, महाविद्यालये तसेच खासगी क्लासेसच्या परिसरात विनाकारण फिरणाऱ्या रोडरोमिओंवर वचक ठेवण्यासाठी पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार आणि जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम सुरू आहे. निर्भया पथकातील पोलीस कर्मचारी मयुरी खोसे आणि आशिष जगताप हे विविध शाळा व महाविद्यालयांना भेट देऊन विद्यार्थी-विद्यार्थिनींना मार्गदर्शन करत आहेत.

महिलांवरील अत्याचार रोखणे, गुन्ह्यांबाबत जनजागृती करणे, संशयास्पद हालचालींबाबत पोलिसांना माहिती देणे तसेच सुरक्षिततेचे नियम पाळणे याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली जात आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होत आहे.

ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत विद्यार्थिनींच्या सुरक्षेला प्राधान्य देत अशा जनजागृती मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी सांगितले.

## 'मॅगनेट' प्रकल्पाच्या नावाने अफवा

### शेतकऱ्यांनी फसव्या संदेशांपासून सावध राहावे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** 'मॅगनेट' प्रकल्पाच्या नावाखाली फसवणूक केल्याने अटक, अशा आशयाच्या बातम्या आणि सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या संदेशांमुळे गैरसमज निर्माण होत आहेत. या संदेशांचा महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅगनेट) प्रकल्पाशी कोणताही संबंध नसल्याचे प्रकल्प प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शेतकरी आणि नागरिकांनी अशा दिशाभूल करणाऱ्या संदेशांवर विश्वास ठेवू नये, तसेच प्रकल्पाच्या नावाचा गैरवापर करणाऱ्या व्यक्तींपासून सावध राहावे, असे आवाहन प्रकल्प संचालकांनी केले आहे.

मॅगनेट प्रकल्पाचा मुख्य उद्देश शेतमालाची काढणीनंतर होणारी नासाडी कमी करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा आहे. आशियाई विकास बँकेच्या आर्थिक सहकार्याने महाराष्ट्र शासनामार्फत या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जात आहे. प्रकल्पामध्ये फळपिके आणि फुलपिकांचा समावेश आहे.

राज्यातील १४ प्रमुख फळपिके आणि विविध फुलपिकांसाठी एकात्मिक मूल्यसाखळी विकसित करण्यावर प्रकल्पाचा भर आहे. यामध्ये रोपवाटिका विकास, नवीन वाणांचा प्रसार, शेतकरी उत्पादक संस्थांचे सक्षमीकरण, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, काढणीनंतरचे व्यवस्थापन, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ विकास आणि सार्वजनिक पायाभूत सुविधांची उभारणी यांचा समावेश आहे.

प्रकल्पातील पिकांच्या मूल्यसाखळी विकासासाठी शेतकरी उत्पादक संस्था आणि गुंतवणूकदारांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत नवीन तसेच विद्यमान सुविधांचा विकास करण्यात येणार आहे.

**गुंतवणुकीवर व्याज अथवा परताव्याचे आश्वासन नाही**

**मॅगनेट प्रकल्पामध्ये गुंतवणूक केल्यास त्यावर व्याज किंवा परतावा देण्याचे कोणतेही आश्वासन प्रकल्पाकडून देण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रकल्पाच्या नावाने फिरणाऱ्या आर्थिक व्यवहारासंदर्भातील फसव्या संदेशांना बळी पडू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रकल्पासंदर्भातील अधिकृत माहितीसाठी मॅगनेट प्रकल्पाचे अधिकृत संकेतस्थळ याचाच आधार घ्यावा, असे आवाहन प्रकल्प संचालकांनी केले आहे.**

## भर पावसात पोस्टाची सेवा; आळंदीतील पोस्ट कार्यालयाच्या स्वतंत्र इमारतीचा प्रश्न ऐरणीवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**आळंदी :** आळंदी शहरातील पोस्ट कार्यालयाच्या स्वतंत्र जागेचा प्रश्न तब्बल ५० वर्षांपासून प्रलंबित असल्याने नागरिकांना आजही अत्यंत गैरसोयीच्या परिस्थितीत टपाल सेवा घ्यावी लागत आहे. भर पावसात रस्त्यावर उभे राहून व्यवहार करावे लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

प्रदक्षिणा मार्गावरील सोम वंशीय क्षत्रिय कासार धर्मशाळेतील अवघ्या १० बाय १० फूटांच्या खोलीत आणि एका खिडकीतून हे पोस्ट कार्यालय कार्यरत आहे. व्यवहारासाठी ग्राहकांना खिडकीपाशी रांगेत उभे राहावे लागते. कार्यालयाबाहेर ऊन, वारा आणि पावसापासून संरक्षणासाठी कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिकांना रस्त्यावरच ताटकळत उभे राहावे लागते. बसण्यासाठी बाकांसारख्या मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याची तक्रार नागरिकांनी केली.

या प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत आळंदी शहर शिवसेनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. पोस्ट कार्यालयासाठी आरक्षित जागा उपलब्ध असूनही केंद्रीय टपाल विभागाने स्वतंत्र इमारत उभारण्यासाठी कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नसल्याचे शहरप्रमुख राहुल चव्हाण यांनी सांगितले. हा प्रश्न तातडीने निकाली न काढल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनीही या प्रश्नाची दखल घेत पुणे विभागाच्या पोस्टमास्टर जनरल प्रीती अग्रवाल यांना निवेदन सादर करून आळंदी पोस्ट कार्यालयासाठी स्वतंत्र इमारतीची मागणी केली आहे. आळंदी हे लाखो वारकरी भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान असून वर्षभर तसेच आषाढी व कार्तिकी वारीदरम्यान येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ असते. त्यामुळे या धार्मिक नगरीत आधुनिक सुविधांनी सुसज्ज स्वतंत्र पोस्ट कार्यालयाची उभारणी करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## परदेशी अभ्यास दौऱ्यासाठी जाण्याची शेतकऱ्यांना संधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादनवाढीच्या पद्धती आणि परदेशातील यशस्वी शेती प्रयोगांचा अभ्यास करण्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांसाठी युरोप आणि चीन अभ्यास दौऱ्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. या दौऱ्यांसाठी पुणे जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांनी २२ ऑगस्ट २०२६ पर्यंत तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे.युरोप अभ्यास दौऱ्यात फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि दुग्धोत्पादन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळणार आहे. तर चीन दौऱ्यात विविध कृषी तंत्रज्ञान, पीक उत्पादकता वाढविण्यासाठीच्या पद्धती तसेच कृषी प्रदर्शनांचा अभ्यास करता येणार आहे. परदेशातील तंत्रज्ञान आणि शेती पद्धतींचा अभ्यास करून त्याचा शेतकऱ्यांना आपल्या शेतीत उपयोग करता यावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**२२ ऑगस्टपर्यंत अर्ज करावेत**

**५० टक्के खर्च किंवा दोन लाखांपर्यंत अनुदान**

अभ्यास दौऱ्यासाठी शासनाकडून एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त दोन लाख रुपये, यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान म्हणून देण्यात येणार आहे. लाभार्थ्याचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडलेले असणे आवश्यक आहे. निवड झाल्यानंतर दौऱ्याची तारीख निश्चित होऊन कृषी विभागाचे पत्र मिळाल्यावर अनुदानाची रक्कम वजा करून उर्वरित खर्च प्रवासी कंपनीकडे आगाऊ जमा करणे बंधनकारक राहणार आहे.

**निवडीसाठी अटी**

लाभार्थी स्वतः शेतकरी असावा. त्याच्या नावावर चालू कालावधीचा ७/१२ व ८-अ उतारा असणे, उत्पन्नाचे मुख्य साधन शेती असल्याचे स्वयंघोषणापत्र आणि ॲग्रीस्टॅकअंतर्गत फार्मर आयडी असणे आवश्यक आहे. एका शेतकरी कुटुंबातील केवळ एका व्यक्तीलाच या योजनेचा लाभ घेता येईल. शेतकऱ्याचे वय किमान २५ वर्षे पूर्ण असावे. वैध पासपोर्ट असणे आवश्यक असून तो शासकीय, निमशासकीय, सहकारी किंवा खासगी संस्थेत नोकरीत नसावा. डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल, अभियंता किंवा कंत्राटदार नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल. यापूर्वी शासकीय अर्थसहाय्याने विदेश दौरा केलेला नसल्याचे स्वयंघोषणापत्र तसेच परदेश दौऱ्यासाठी शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याचे एमबीबीएस डॉक्टरचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## निमगाव म्हाळुंगी येथे भर दिवसा घरफोडी

### १९ तोळ्यांचे दागिने चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**निमगाव म्हाळुंगी (ता. शिरुर) येथे चोरट्यांनी उचकटलेले कपाट.**

**तळेगाव ढमढेर :** निमगाव म्हाळुंगी (ता. शिरुर) येथे अज्ञात चोरट्यांनी दिवसा ढवळ्या घराचा दरवाजा उचकटून कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी केल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली असून शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निमगाव म्हाळुंगी (ता. शिरुर) येथील रणदिवे वस्ती येथे राहणारे अमोल काळकुटे यांच्या दोन मुली ६ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास शाळेत गेलेल्या होत्या, तर अमोल यांची पत्नी शेळ्या घेऊन शेतात गेलेली असताना अमोल देखील शेतात गेलेले होते, सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास अमोलची आई देखील शेतात गेली, साडेदहा वाजण्याच्या सुमारास अमोल हे घरी आले असता त्यांना लांबून घराचा दरवाजा उचकटलेला दिसल्याने त्यांनी कुटुंबियांना आवाज देत घराकडे पळत जाऊन पाहणी केली असता घरातील कपाट उघडे आणि सर्व साहित्य अस्ताव्यस्त पडल्याचे दिसून आल्याने, त्यांनी घरात पाहणी केली असता घरातील तब्बल एकोणीस तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व सेहेचाळीस हजार रुपये रोख रक्कम चोरट्यांनी चोरी केल्याचे समोर आले, घटनेची माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांना मिळताच पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर, जीनेश कोळी, पोलीस हवालदार अमोल दांडगे, रोहिदास पारखे, श्रीमंत होनमाने, नारायण वाळके, मच्छिंद्र निचित, राम जाधव यांसह आदींनी घटनास्थळी हेत देऊन पंचनामा करत पाहणी केली, सदर घटनेबाबत अमोल सोपान काळकुटे (वय ४० वर्षे रा. रणदिवे वस्ती निमगाव म्हाळुंगी, ता. शिरुर, जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख हे करत आहे.

# अंगणवाडीच्या पोषक आहारातील वाटाणा निकृष्ट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दौंड :** तालुक्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये ० ते ३ वयोगटातील बालकांना पुरविण्यात येणाऱ्या पोषक आहाराच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. अंगणवाड्यांना पुरविण्यात येणारा पांढरा वाटाणा निकृष्ट दर्जाचा असून, त्यामध्ये अळ्या आढळत असल्याची तसेच हा वाटाणा शिजत नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात आली आहे.

कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाकडून पोषण आहार योजना राबविली जाते. या योजनेंतर्गत बालकांना सकस आणि दर्जेदार आहार मिळणे अपेक्षित आहे. मात्र, निकृष्ट दर्जाचा आहार पुरविला जात असल्यास बालकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

या प्रकाराची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पोषक आहाराच्या गुणवत्तेची तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. तसेच दौंड विधानसभा मतदारसंघातील आजी-माजी लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. हा प्रश्न कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसून, अंगणवाडीतील चिमुकल्यांच्या आरोग्य आणि पोषणाशी निगडित आहे. त्यामुळे निकृष्ट आहार पुरवठ्याची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. संबंधित पुरवठादार किंवा कंत्राटदार दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करून काळ्या यादीत टाकण्याची शिफारस करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



**अंगणवाडीला पुरवठा होणारा पांढरा वाटाणा हा निकृष्ट दर्जाचा असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत जिल्हा परिषद कार्यालयाकडे याबाबत तक्रारी दाखल केल्या आहेत. चांगला आणि दुसरा वाटाणा पुरवठा करावा अशी जिल्हा परिषदेकडे मागणी केली आहे. लवकरच याबाबत वरिष्ठांचा अहवाल सादर होईल.**

**– संदीप काळे, बालविकास प्रकल्प अधिकारी दौंड.**

# जेऊरमध्ये दीड लाखांच्या डाळिंबावर डल्ला!

## डाळिंबाला सोन्याचा भाव; चोरट्यांचा मोर्चा थेट बागांकडे!


जेऊर परिसरातील तोडमलवाडी येथील याच डाळिंबाच्या बागेतून फळांची चोरी झाली आहे.

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** डाळिंबाला सध्या चांगला बाजारभाव मिळत असल्याने चोरट्यांनी थेट उभ्या डाळिंबाच्या बागांनाच लक्ष्य केल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. जेऊर परिसरातील तोडमलवाडी येथील शेतकरी आकाश कैलास तोडमल यांच्या डाळिंब बागेतील मागील आठवड्यात सुमारे ५० ते ६० कॅरेट, म्हणजेच पाच ते सहा क्विंटल डाळिंब चोरीला गेले. या चोरीत शेतकऱ्याचे अंदाजे एक ते दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती तोडमल यांनी दिली.

दोन दिवसांपूर्वी रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास पुन्हा त्याच बागेत चोरीचा प्रयत्न झाला. मात्र आकाश तोडमल स्वतः बागेची राखण करत असल्याने चोरट्यांना तेथून पळ काढावा लागला. सध्या डाळिंबाला प्रतिकिलो २०० ते ३०० रुपयांपर्यंत भाव मिळत असल्याने बागांमधील फळांवर चोरट्यांची नजर लागली आहे. मागील महिन्यातही तोडमलवाडीतील एका शेतकऱ्याच्या बागेतून डाळिंब चोरीची घटना घडली होती. त्यामुळे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

वर्षभर मोठा खर्च, कष्ट आणि सातत्याने निगा राखल्यानंतर तोडणीच्या टप्प्यावर आलेल्या पिकावरच चोरटे डल्ला मारत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडत आहे. यापूर्वी धान्य, पशुधन आणि शेती अवजारांच्या चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. मात्र आता उभ्या फळबागाच चोरट्यांच्या निशाण्यावर आल्याने शेतकऱ्यांची झोप उडाली आहे.

अपुऱ्या पावसामुळे खरीप आणि रब्बी हंगामाबाबत आधीच अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यात डाळिंब चोरीच्या वाढत्या घटनांनी बळीराजाची चिंता आणखी वाढविली आहे. आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर डाळिंब चोरांचे नवे संकट उभे ठाकले आहे.

**बाग नसताना डाळिंब विक्री ? गावात चर्चांना उधाण !**

मागील आठवड्यात गुलमोहर रस्त्यावर एका व्यक्तीकडून डाळिंबाची विक्री होत असल्याचे काही नागरिकांनी पाहिल्याची चर्चा आहे. संबंधित व्यक्तीकडे स्वतःची डाळिंबाची बाग नसल्याचे बोलले जात असल्याने या प्रकाराबाबत परिसरात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. सदर व्यक्तीने यापूर्वी संशयास्पद उद्योग केलेले आहेत. डाळिंब चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर या चर्चेलाही महत्त्व प्राप्त झाले आहे.

---

**द•ख•ल**

### शिवपाणंदचे नगर तहसिलवर यशस्वी मिशन ; झिरो पेण्डन्सी अभियान!

**नगर तालुका :** महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे अध्यक्ष शरद पवळे यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद शेत रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी, शेत व शिवरस्त्यांवरील अतिक्रमणे तातडीने हटविणे, रस्त्यांची मोजणी, सीमांकन आणि प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करण्याबाबत जिल्हा प्रशासनाकडे सविस्तर निवेदन सादर केले होते. या निवेदनाची दखल घेत तहसीलदार मिलिंद कुलथे अहिल्यानगर यांनी दि. ०३ ऑगस्ट २०२६ रोजी संबंधित सर्व विभागांना पत्र काढून दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी तहसील कार्यालय, अहिल्यानगर येथे समन्वय बैठकीचे आयोजन केले आहे. बैठकीस उपअधीक्षक भूमी अभिलेख, गटविकास अधिकारी, विविध पोलीस ठाण्यांचे निरीक्षक, वन विभागाचे अधिकारी तसेच संबंधित महसूल अधिकारी यांना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बैठकीत शेत व शिवरस्त्यांवरील अतिक्रमणे दूर करणे, रस्त्यांची मोजणी व सीमांकन, प्रलंबित तक्रारींचे निराकरण तसेच शेतकऱ्यांना रस्त्यांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाहीवर चर्चा होणार आहे.तहसील कार्यालयाच्या पत्रानुसार, मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी आपल्या सज्जातील शेतकऱ्यांमध्ये व्यापक जनजागृती करावी तसेच ज्या शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांबाबत वाद, अतिक्रमण किंवा अडचणी आहेत, अशा शेतकऱ्यांना बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी शरद पवळे, आशिष कासार,गणेश इंगळे, बाळासाहेब थोरात, पोपट शेळके, अक्षय जगताप, सचिन शेळके, एकनाथ पवार, आशिष कासार, रामदास तनपुरे, विठ्ठल मिसाळ, दादासाहेब शिरसाठ, गोवर्धन शिरसाठ, कृष्णा चव्हाण, राजेंद्र शिरसाठ, जालिंदर आठरे, राहुल गट, आंबादास आव्हाड, सुधीर भद्रे,राहुल पवने, विक्रांत कासार यांनी प्रशासनाने तातडीने प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली असून शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### महावितरणच्या विरोधात सचिन खंडागळेंचे पुन्हा उपोषण

**तिसगाव :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या (महावितरण) तिसगाव उपविभागातर्गत येणाऱ्या १३ गावांमध्ये करण्यात आलेल्या नवीन विद्युतीकरणाची कामे, देखभाल दुरुस्तीतील अनियमितता, बोगस कामे आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) सामाजिक न्याय विभागाचे विधानसभा संघटक श्री. सचिन खंडागळे यांनी पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला आहे. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई व्हावी, यासाठी त्यांनी १० ऑगस्टपासून उपोषणाला बसण्याचे निवेदन प्रशासनाला दिले आहे.यापूर्वी ९ मार्च रोजी सचिन खंडागळे यांनी याच मागण्यांसाठी उपोषण केले होते. त्यावेळी अहिल्यानगर मंडल कार्यालयाचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांनी १० एप्रिलपर्यंत या सर्व कामांची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. त्या लेखी आश्वासनानंतर १० मार्च रोजी खंडागळे यांनी आपले उपोषण मागे घेतले होते. मात्र, चौकशीचे आश्वासन देऊन तब्बल चार महिन्यांपेक्षा जास्त काळ लोटला तरी महावितरण प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई अथवा चौकशी झालेली नाही. प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे संतप्त झालेल्या सचिन खंडागळे यांनी १० ऑगस्टपासून कार्यालयासमोर पुन्हा उपोषणाला बसण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.१३ गावांतील नवीन विद्युतीकरण आणि देखभाल-दुरुस्ती कामांची निष्पक्ष चौकशी व्हावी. बोगस आणि कागदोपत्री दाखवलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी. महावितरणमधील आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे.

---

## प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात नागरिकांचा एल्गार!

### रहिवाशांच्या न्यायासाठी पालकमंत्री विखे पाटील यांना निवेदन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** राशीन येथील श्री जगदंबा देवी मंदिराच्या सभामंडपात गट क्रमांक १४७६ व १४७७ मधील रहिवाशांनी एकत्र येत महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना सविस्तर निवेदन सादर करून शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत नोंदी कायम करण्याची जोरदार मागणी केली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, १६ फेब्रुवारी २०१८ व २५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार निवासी अतिक्रमणे नियमित करून ग्रामपंचायत नोंदी कायम करण्याची तरतूद असतानाही संबंधित प्रशासनाकडून सातत्याने दिरंगाई होत आहे. ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तब्बल १५२ अर्ज सादर करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, गट क्रमांक १४७६ व १४७७ मध्ये गेल्या ५० वर्षांहून अधिक काळापासून लोकवस्ती, घरे व दुकाने अस्तित्वात आहेत. या परिसरात शासनाच्या निधीतून रस्ते, गटारे, विद्युतीकरण, घरकुल, व्यायामशाळा, स्मशानभूमी तसेच दलित वस्ती विकासाची विविध कामे करण्यात आली असून, पूर्वी ग्रामपंचायतीमार्फत पाणीपट्टी, घरपट्टी आणि दुकानकरही नियमित वसूल केला जात होता. या निवेदनावर तात्यासाहेब माने, माजी ग्रामपंचायत सदस्य रामशेठ कानगुडे, भाजपा नेते सोयब काझी, विक्रमसिंग परदेशी, आप्पा काशीद, सौरभ दोशी, निवृत्ती पाटील, अविनाश मासाळ, राजेंद्र राऊत यांच्यासह अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता पालकमंत्र्यांच्या सूचनांनंतर प्रशासन किती वेगाने कार्यवाही करते आणि गट क्रमांक १४७६ व १४७७ मधील रहिवाशांना न्याय मिळतो का, याकडे संपूर्ण राशीन परिसराचे लक्ष लागले आहे.

---

## सीएसआर फंडातून श्री वृद्धेश्वर विद्यालयास अडीच लाखांचे अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह पॅनल भेट



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव :** श्री वृद्धेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तिसगाव या विद्यालयास हर्मन इंटरनॅशनल लिमिटेड, पुणे या कंपनीच्या सीएसआर फंडातून सुमारे अडीच लाख रुपये किमतीचे सॅमसंग कंपनीचे अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह पॅनल प्रदान करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर यांच्या मध्यवर्ती संस्था कार्यालयात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव मुकेशदादा मुळे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर यांची उपस्थिती होती.विद्यालयास इंटरॅक्टिव्ह पॅनल मिळवून देण्यासाठी संस्थेचे सचिव ड. विश्वासराव आठरे पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी हर्मन इंटरनॅशनल लिमिटेडचे प्रोडक्शन डायरेक्टर अशोक मरकड, सीनियर मॅनेजर रणजीत पाटील, मॅनेजर अतुल शेडगे, सहायक मॅनेजर योगेश वळसंग, महाराष्ट्र शासन उद्योग विभागाचे उपसंचालक स्वप्निल देशमुख तसेच मॅनेजर चक्रधर शुक्ला उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य संजय म्हस्के व ज्योतिबा आठरे यांच्या सातत्यपूर्ण पत्रव्यवहारामुळे, संस्था सदस्य अरविंद आठरे पाटील यांच्या विशेष प्रयत्नांमुळे तसेच विद्यालयाचे माजी उपक्रमशील शिक्षक स्वप्निल लवांडे यांच्या महत्त्वपूर्ण सहकार्यामुळे विद्यालयाला हे आधुनिक इंटरॅक्टिव्ह पॅनल प्राप्त झाले. त्यांच्या योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला.यावेळी हर्मन इंटरनॅशनल लिमिटेडचे प्रोडक्शन डायरेक्टर अशोक मरकड यांनी भविष्यातही विद्यालय व संस्थेला अध्ययन-अध्यापनासाठी आवश्यक आधुनिक शैक्षणिक साधने सीएसआर फंडातून उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन दिले. तसेच उपसंचालक स्वप्निल देशमुख यांनीही आपल्या मनोगतातून या उपक्रमाचे कौतुक केले. संस्थेचे सहसचिव मुकेशदादा मुळे व अध्यक्ष रा. ह. दरे यांनी संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेत हर्मन इंटरनॅशनल लिमिटेडचे आभार मानले.

---

## स्व. अजितदादा पवार स्मृती चषक स्पर्धेत विजेत्यांचा आ. दातेंच्या हस्ते गौरव




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** स्व. उप मुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहानिमित्त पारनेर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांपैकी स्व. अजितदादा पवार स्मृती चषक पावसाळी क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना व बक्षीस वितरण सोहळा राळेगण थेरपाळ येथे पार पडला. यावेळी आ. काशीनाथ दाते यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या संकल्पनेतून ही स्पर्धा आयोजित केली होती.स्पर्धेच्या अंतिम सामन्यात साईराम ११, शिरूर आणि मांडवगण फराटा या बलाढ्य संघांमध्ये रंगतदार लढत झाली. प्रथम फलंदाजी करत साईराम ११, शिरूर संघाने ७३ धावांचे आव्हान उभे केले. मात्र हे आव्हान समर्थपणे पेलत मांडवगण फराटा संघाने शानदार खेळी करत अंतिम सामना जिंकून स्व. अजितदादा पवार स्मृती चषक आपल्या नावावर केला. अंतिम सामन्याने उपस्थित क्रीडाप्रेमींना शेवटच्या क्षणापर्यंत खिळवून ठेवले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, प्रशांत गायकवाड, वसंतराव चेडे, जिल्हा सरचिटणीस सुधामती कवाद, लाडकी बहीण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, नगरसेवक अशोक चेडे, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, दिनेश बाबर, उपाध्यक्षा रेश्मा गलांडे, रमेश वरखडे, स्वप्नील ठुबे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---



## पाल्यांचे जीवन घडवण्यात आईचा मोलाचा वाटा : डॉ. राणीताई काटे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** प्रत्येक मातांनी आपल्या पाल्याचे जीवन घडविण्यासाठी मोलाचा वाटा उचलावा तसेच आपल्या पाल्यांशी मित्रत्वाने वागावे असे प्रतिपादन डॉ. राणीताई काटे यांनी केले. चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माता पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती उषाताई बिडे या .कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य संपत दसपुते, उपप्राचार्य सुनील जायभाये, वत्सला जाधव, अश्विनी अकोलकर, विद्यावर्धिनी मुळे, जिजाबाई काळे,उषा बिडे,सरिता काळे, प्रतीक्षा नाचन, अलका शिंदे, योगिता मडके, ज्योती पालवे आदी मान्यवर उपस्थित . डॉ.काटे पुढे म्हणाल्या की, आपल्या मुलांना सकस आहार द्या.तसेच मोड आलेले कडधान्याचा आहारात समावेश करावा. सतत स्वच्छतेची काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले.माता पालक मेळावा प्रसंगी विविध माता पालकांनी आपल्या समस्या मांडल्या.त्या समस्यांना उत्तर देताना विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते म्हणाले की, माझ्यासह सर्व शिक्षक बंधू भगिनी यांचा विद्यार्थी समृद्ध करणे व त्यांचा सर्वांगीण विकास करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे.त्याचबरोबर तुम्ही मातांनी देखील आपल्या पाल्यांच्या पाठीशी ठाम उभे रहावे.त्यांचे मित्र तपासा व त्यांची इतर मुलांशी तुलना करू नये असे आवाहन त्यांनी केले . जेष्ठ शिक्षिका वत्सला जाधव,विद्यावर्धिनी मुळे आदींनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले व पालकांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन त्यांचे समर्थन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्षीय सूचना विद्यावर्धिनी मुळे यांनी केले तर आभार अधिक्षिका अश्विनी अकोलकर यांनी मानले.

---

## पाथर्डीहुन अक्कलकोटसाठी बस सेवा सुरू : प्रवाशांकडून स्वागत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**टाकळीमानूर :** पाथर्डी तालुक्यातील भाविक, व्यापारी व प्रवासी संघटनेची मागणी लक्षात घेता पाथर्डी आगाराने अखेर अक्कलकोट ला जाण्यासाठी अति जलद बस सेवा सुरू केल्याने या सेवेचे प्रवाशांनी जोरदार स्वागत केले. पाथर्डी तालुक्यातून दैनंदिन व्यापारासाठी सोलापूर, हैदराबाद येथे मोठा संपर्क असून तुळजापूर व अक्कलकोट येथील धार्मिक पर्यटनासाठी भाविकांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक भाविकांना बीड अथवा अहिल्यानगर वरून गाडी बदलून जावे लागत असे. याबाबत माहिती देताना आगार प्रमुख अमित बनसोडे म्हणाले, बऱ्याच दिवसांची प्रवाशांची मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहकार्याने शक्य झाला आहे.पाथर्डी आगाराला नुकत्याच पाच जिजाऊ बसेस नव्याने प्राप्त झाल्या. भाविकांच्या सोयीसाठी रात्रभर गाडी अक्कलकोटला थांबून सकाळी साडेसहा वाजता परतीच्या प्रवासासाठी निघते. याच मार्गाने पुन्हा दुपारी तीन वाजता पाथर्डी ला पोहोचते. प्रवाशांनी या सेवेचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा. अशाच पद्धतीने पंढरपूरसाठी नियमित बस लवकरच सुरू याची प्रवासी संघाची मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. असे बनसोडे म्हणाले. पाथर्डी आगाराला लांब पल्ल्याच्या गाड्यांची आवश्यकता असून शेगाव, गंगापूर मार्गे वैजापूर, वणी , माहूरगड जेजुरी अशा ठिकाणी भाविकांची सतत गर्दी असते. पुढील वर्षी कुंभमेळा असून तिसगाव,वांबोरी मार्गे नाशिक ,त्र्यंबकेश्वर येथे बस सेवा अत्यावश्यक ठरणार आहे. प्रवासी संघाची मागणी पूर्ण केल्याबद्दल संघटनेतर्फे सरचिटणीस मुकुंद गर्जे, राजेंद्र जोशी, राजेंद्र शिंदे, अनिल खाटेर, अमोल गर्जे आदींनी महामंडळाचे आभार मानले. तसेच स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे यांनीही या सेवेचे स्वागत केले आहे.

---

## जामखेडमध्ये दुकानाच्या वादातून घरात घुसून मारहाण

### चारचाकी वाहनाची तोडफोड; आठ जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** भाड्याने घेतलेले दुकान खाली करण्याच्या कारणावरून फीर्यादीच्या गाडीवर हल्ला करित चारचाकी वाहनाची तोडफोड केली. तसेच घरात घुसून फीर्यादी यांच्या कुटुंबीयांना कोयता, काठी व दगडाने मारहाण करून जखमी केले. या हल्ल्या प्रकरणी एकुण आठ जणांविरोधात जामखेड पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत समीर तैनुर खान (वय ३८, व्यवसाय - मार्केटिंग, रा. सदाफुले वस्ती, जामखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, म्हंटले आहे की मी पत्नी, आई-वडील, भाऊ, भावजय व मुलांसह एकत्र राहातो. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी ते मार्केटिंगचे काम करतात. फीर्यादी समीर तैनुर खान यांनी भाड्याने घेतलेले दुकान हकीम आतार यांच्या मालकीचे असून, दुकान लवकर खाली करण्यासाठी फीर्यादीस वारंवार दमदाटी करण्यात येत होती.

दि ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास फीर्यादी हे कामानिमित्त आष्टी येथे गेले होते. त्यावेळी हकीम आतार यांनी फोन करून सांगितले की तुम्ही जामखेडला या मला तुमच्या सोबत बोलायचे आहे त्यानुसार फीर्यादी हे जामखेड येथे परत आले. खर्डा रोडवर हकीम आतार यांची भेट झाल्यानंतर त्यांनी दुकानाची चावी फिर्यादीकडे दिली.

त्यानंतर रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी समिर खान हे त्यांच्या चारचाकी वाहन क्र. (एमएच-१६ ए.टी-९२०४) याने घरी जात असताना खर्डा रोडवरील कॅफेनाज हॉटेलसमोर पांढऱ्या रंगाच्या चारचाकीतून काही जण खाली उतरले. त्यांनी कोयता व तलवारीने वाहनावर हल्ला करून वाहनाचे नुकसान केले.

यानंतर फिर्यादी समीर तैनुर खान हे आपल्या सदाफुले वस्ती येथिल घरी पोहोचल्यानंतर संबंधित आरोपी चारचाकी व मोटारसायकलवरून त्यांच्या घरापर्यंत आले. आरोपींनी घरात घुसून दगड, विटांनी तसेच कोयत्याने फिर्यादी, त्यांची आई झकिया खान आणि वडील तैनूर खान यांना मारहाण करून जखमी केले. फिर्यादीला कोयत्याने पाठीवर मारून जखमी केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

फिर्यादीची आई झकिया या सोडविण्यास आल्या असता त्यांनाही ढकलून देण्यात आले. तसेच हकीम आतार यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण जबरदस्तीने तोडून नेले आहे.

घटनेदरम्यान शेजारी राहणारे अलीशान जांगीर खान, फिरोज इस्माईल खान व वसीम नजिर खान यांनी मध्यस्थी करून आरोपींच्या तावडीतून कुटुंबाची सुटका केली. मात्र, आरोपींनी शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्यानंतर ते तेथून निघून गेले. घटनेनंतर जखमींनी ग्रामीण रुग्णालय, जामखेड येथे उपचार घेतले. त्यानंतर जामखेड पोलीस ठाण्यात समीर तैनुर खान यांनी फिर्याद दाखल दिली आहे.

या प्रकरणी मुजफर गनी आत्तार, हकीम आत्तार (पुर्ण नाव माहित नाही), अकीब उर्फ पिल्या आत्तार, साद आत्तार (पुर्ण नाव माहित नाही), आदर्श आत्तार (पुर्ण नाव माहित नाही), सोहेल जावेद आत्तार, आसिफ आत्तार (पुर्ण नाव माहित नाही), आणि जईद जावेद आत्तार (सर्व रा. जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध घरात घुसून मारहाण, वाहनाचे नुकसान, दागिना हिसकावणे, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. कॉ. संजय लोखंडे हे करित आहेत.

---

## जुन्या वादातून तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जामखेड शहरातील खर्डा चौक परिसरात जुन्या वादाच्या कारणावरून एका तरुणावर कोयता व वीटाने जीवघेणा हल्ला करून त्याच्या गळ्यातील दिड तोळ्याची सोन्याची साखळी हिसकावून घेतल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी जामखेड एकुण तीन जणांवर जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आकिब इलाही आत्तार (वय २६, रा. जामखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.३० वाजता शहरातील खर्डा चौक येथील एका चहाच्या दुकानासमोर मोटारसायकलवर बसले होते. यादरम्यान गुड्डू खान (पूर्ण नाव माहिती नाही), आमीर तैमुर खान व समीर तैमुर खान हे तेथे आले. यावेळी आमिर तैमुर खान याने फिर्यादीस, तू आमच्याकडे रागाने का पाहतोस? अशी विचारणा केली. त्यावर याच कारणामुळे वाद निर्माण झाला. त्याचवेळी (गुड्डू खान पुर्ण नाव माहित नाही) याने हातातील नारळ सोलण्याच्या कोयत्याने फिर्यादी आकिब इलाही आत्तार याच्या डोक्यावर वार केला. त्यानंतर आरोपींनी शिवीगाळ व दमदाटी करत फिर्यादीच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोन्याची साखळी जबरदस्तीने काढून घेतली. फिर्यादी स्वतः चा बचाव करण्याचा प्रयत्न करत असताना आमिर तैमुर खान व समिर तैमुर खान यांनी हातातील वीटाने पाठीवर मारहाण केली या मारहाणीत फीर्यादी हा गंभीर जखमी झाला. तसेच, आमच्या नादी लागलास तर तुझे तुकडे करू, अशी धमकी दिली. झटापटीदरम्यान फिर्यादीचा मोबाईल फोन देखील गहाळ झाला आहे. या घटनेनंतर जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान आरोपी समिर तैमुर खान (वय ३८, रा. सदाफुले वस्ती, जामखेड) हा जामखेडमध्ये असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून त्याला पोलिसांनी ताब्यात घेण्यात आले. चौकशी दरम्यान त्याने गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. याघटनेचा पुढील तपास जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी शिवाजी कदम हे करित आहेत.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार दि.७ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## मुळा धरण साठा ८५ टक्क्यांपर्यंत !



राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्याला वरदान ठरलेले मुळा धरण ८५ टक्क्यांच्या पुढे गेल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिक व शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. जून महिन्यात पावसाने दडी मारल्यामुळे मुळा धरणाची पातळी अतिशय खालावली होती राहुरी शहराला सुद्धा पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे मुळा धरणावर अवलंबून असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह नागरिकांचे डोळे आभाळाकडे लागले होते. परंतु निसर्गाने कृपा केली व जुलै महिन्यात पावसाने मुळा धरणाच्या लाभक्षेत्रात उत्तम प्रकारे हजेरी लावल्याने धरणात मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली व आज धरणाचा साठा ८५ टक्के झाला असून दुपारी तीन वाजता मुळा धरणात २१,९६६ टीएमसी पाण्याचा साठा झाला होता. व धरणात ३,८२२ क्युसेस वेगाने पाण्याची आवक सुरू होती. सायंकाळी सहा वाजता मुळा धरणात राहण्याची आवक वाढल्याने आवक ५,६३८ क्युसेसने मुळा धरणात आवक सुरू झाली व मुळाचा साठा ८५ टक्क्यांवर गेला असून मुळा धरणावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. लाभक्षेत्रात पावसाचे प्रमाण जर असेच राहिले व धरणात येणारी पाण्याची आवक जर अशीच सुरू राहिली तर तांत्रिकदृष्ट्या धरण लवकरच भरू शकते अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे मुळा धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यातून शेतकऱ्यांसाठी खरीप रब्बी हंगामासाठी पाणी सोडले जाऊ शकते. धरणाची पातळी वाढल्यानंतर मुळा नदीत सुद्धा पाण्याचा विसर्ग सोडला जाऊ शकतो. एकंदरीत मुळा धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. त्यामुळे जलसंपदा विभाग व शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# ‘आमचं खत, अन् सरकारची गाडी...!’

### उपसरपंचांनी घंटागाडीचा केला ’गोठा’ | संगमनेरात अजब कारभार उघड....




### खुलासा द्या, नाहीतर ’खुर्ची’ जाणार...!

शासकीय वाहनाचा असा ’शाही’ गैरवापर केल्याप्रकरणी गट विकास अधिकाऱ्यांनी उपसरपंचांना ’कारणे दाखवा नोटीस’ बजावली आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९(१) आणि १४८ नुसार पद रद्द का करू नये? असा थेट सवाल प्रशासनाने विचारल्याने उपसरपंचांची ’घंटी’ वाजली असून तालुक्यातील राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे.

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**घारगाव** : गावाला स्वच्छतेचा धडा शिकवण्यासाठी शासकीय अनुदानातून आणलेली ’घंटागाडी’ स्वतःच्या घरात खत साठवण्यासाठी वापरता येते का ? असा प्रश्न पडला असे तर संगमनेर तालुक्यातील जांभूत खुर्दच्या उपसरपंचांना भेटा ! गावात कचरा संकलनासाठी आलेली ग्रामपंचायतीची गाडी गेल्या दोन वर्षांपासून उपसरपंचांच्या अंगणात उभी राहून चक्क शेळ्यांचे ’लेंडीखत’ आणि शेण वाहण्याचे काम करत असल्याचा धक्कादायक अन् तितकाच मजेशीर प्रकार उघडकीस आला आहे.

जांभूत खुर्दचे उपसरपंच सुभाष भिमाजी डोंगरे यांनी ग्रामपंचायतीची घंटागाडी स्वतःच्या खाजगी मालमत्तेसारखी वापरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. गावातील कचरा उचलण्याऐवजी ही गाडी उपसरपंचांच्या घरचे शेण, खत साठवणे आणि शेतातील कामांसाठी वापरली जात होती. ग्रामस्थांनी गट विकास अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतर विस्तार अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. तेव्हा अधिकाऱ्यांनाही धक्का बसला घंटागाडी गेल्या २ वर्षांपासून उपसरपंचांच्याच ताब्यात होती. गाडीत गावाचा कचरा नाही, तर शेळ्यांचे लेंडीखत आणि पालापाचोळा खच्चून भरला होता.

## रस्त्यावर मोकाट जनावरांचा हैदोस श्रीरामपूरकरांचा जीव मुठीत



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोकाट गायी व बैलांचा वाढता वावर नागरिकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरत आहे. थत्ते मैदान, पूर्णवाद नगर, मुळा-प्रवरा मार्ग, एचडीएफसी बँक परिसर तसेच संगमनेर-नेवासा रोडवर रस्त्याच्या मध्यभागी जनावरे तासन्तास बसून राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. भरधाव वाहनांसमोर अचानक जनावरे आल्याने गंभीर दुर्घटनांची शक्यता कायम आहे. नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नसल्याची खंत व्यक्त केली आहे. मोकाट जनावरांमुळे रस्त्यांवर अस्वच्छताही वाढत असून शहराच्या सौंदर्यावर विपरीत परिणाम होत आहे. नगरपालिका, पशुसंवर्धन विभाग आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्त मोहीम राबवून मोकाट जनावरे सुरक्षित गोशाळांमध्ये हलवावीत, तसेच संबंधित मालकांवर नियमांनुसार कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## सासरच्या छळाला कंटाळून तरुणाची आत्महत्या

### सुसाईड नोट व स्टेटसच्या आधारे चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील वळण येथे सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या कथित छळाला कंटाळून एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ३१ जुलै रोजी पहाटे उघडकीस आली. आत्महत्येपूर्वी संबंधित तरुणाने सुसाईड नोट लिहून तिचा फोटो सोशल मीडियावरील स्टेटसला ठेवला होता. या प्रकरणी पत्नीसह चार जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत ज्ञानेश्वर दत्तात्रय भाकरे हे पत्नी व मुलीसह वळण येथे राहत होते. घरगुती कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद होत असल्याने सुमारे पाच महिन्यांपूर्वी पत्नी धनश्री माहेरी पैठण येथे गेली होती. त्यानंतर तिला परत आणण्याचे प्रयत्न करूनही ती सासरी आली नाही. तसेच सासरच्या मंडळींकडून शिवीगाळ, खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या व मानसिक त्रास दिला जात असल्याचे ज्ञानेश्वर यांनी नातेवाईकांना सांगितले होते. ३१ जुलैच्या मध्यरात्रीनंतर त्यांनी सुसाईड नोट लिहून संबंधित व्यक्तींवर कारवाईची मागणी केली आणि राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी मृताचे भाऊ गणेश दत्तात्रय भाकरे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून धनश्री ज्ञानेश्वर भाकरे, संगीता खंडू काळे, अमोल खंडू काळे (रा. पैठण) व सुवर्णा संजय भाकरे (रा. वळण) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### कौटुंबिक वाद आणि कायद्याचा समतोल आवश्यक

महिलांच्या संरक्षणासाठी शासनाने विविध कायदे व तरतुदी लागू केल्या असून त्यांचा उद्देश महिलांवरील अत्याचार रोखणे हा आहे. मात्र काही प्रकरणांमध्ये या कायद्यांचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. सदर प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर काही नागरिकांनी कौटुंबिक वादांमध्ये निष्पक्ष चौकशी होऊन कायद्याचा समतोल वापर व्हावा, तसेच कोणावरही अन्याय होणार नाही यासाठी शासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी व्यक्त केली आहे.

## श्रीगोंद्यात एलसीबीच्या कारवाईचा धडाका

### मग स्थानिक पोलीस नेमके करतात काय?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरोधात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग (एलसीबी) आणि कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाने धडक कारवाया केल्याने अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. मात्र, या सलग कारवायांमुळे स्थानिक श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, श्रीगोंदा पोलीस नेमके करतात तरी काय? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एलसीबीच्या पथकाने जुगार, मटका आणि अवैध दारू व्यवसायावर कारवाई करत ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या विशेष पथकाने अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा वाहनावर कारवाई करत २५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे वाळूमाफियांना मोठा धक्का बसला आहे.

विशेष म्हणजे, या दोन्ही महत्त्वाच्या कारवाया श्रीगोंदा पोलीस ठाण्याऐवजी बाहेरील पथकांनी केल्याने स्थानिक पोलिसांच्या गुप्त माहिती यंत्रणा, प्रतिबंधात्मक कारवाया आणि अवैध धंद्यांवरील नियंत्रणाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. तालुक्यात सुरू असलेल्या अवैध व्यवसायांवर स्थानिक पोलीस स्वतःहून कारवाई का करत नाहीत, अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

अवैध धंद्यांवर सातत्याने कठोर कारवाई होणे आवश्यक असले, तरी त्याची जबाबदारी स्थानिक पोलीस यंत्रणेने अधिक प्रभावीपणे पार पाडावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## शिवसेना नेते भाऊसाहेब गोरे यांचे निधन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शिवसेनेचे (उबाठा) ज्येष्ठ नेते व माजी श्रीगोंदा तालुका प्रमुख भाऊसाहेब उर्फ अनशाबापू हिराजी गोरे (वय ८४ वर्षे) यांचे गुरुवारी (दि. ६) सकाळी ७.४० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.

कै. गोरे यांच्या पार्थिवावर सायंकाळी ५ वा. श्रीगोंदा येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. गोरे यांच्या पश्चात सून, दोन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. श्रीगोंदा येथील गर्व्हनमेंट कान्ट्रॅक्टर ईश्वर जंजिरे, वरिष्ठ पत्रकार अ‍ॅड. डॉ. बाळासाहेब बोठे पा.व श्रीमती जयश्री गोरे यांचे ते सासरे, सौ. सुनीता जंजिरे व ड. सविता बोठे पा.यांचे वडील तर सहा. पोलिस आयुक्त ( ACP) महेश ईश्वर जंजिरे, माध्यमतज्ज्ञ यश बाळासाहेब बोठे पा. व युवा कार्यकर्ते जयराज राजकुमार गोरे यांचे ते आजोबा होत. मुंबईत शिवसेनेचा जन्म झाला त्याच कालावधीत कै. गोरे यांनी श्रीगोंदा येथे अत्यंत प्रतिकूल राजकीय परिस्थितीत शिवसेना स्थापन करण्यात महत्वाची भूमिका बजावली. काळाच्या ओघात आलेली अनेक आमिषे व विविध प्रकारच्या दबावाला न जुमानता त्यांनी शिवसेनेशी अखेरपर्यंत प्रामाणिक राहून सच्चा शिवसैनिक म्हणून कार्यरत राहिले.

खुद्द शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्या कामाची वेळोवेळी व्यक्तिशः दखल घेतली. त्यामुळेच ठाकरे घराण्याशी कै. भाऊसाहेब गोरे यांची अखेरच्या क्षणापर्यंत विशेष जवळीक होती.

## ओ.... रस्ते नीट करता का... नीट ; श्रीरामपूरकराची हाक

### नगरपालिकेचा हलगर्जी कारभार चव्हाट्यावर | शहरातील प्रमुख रस्ते बनले ‘मृत्यूचे सापळे’!





प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : नगरपालिकेच्या बेजबाबदार आणि हलगर्जी कारभारामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहेत.

वाढत्या खड्ड्यांमुळे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहेत. त्याबरोबर अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत असतानाही पालिका प्रशासन आणि सत्ताधारी या गंभीर प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते बोरुडे यांनी नगरपालिकेकडे तक्रार दाखल केली आहे. या मार्गावरून दररोज हजारो विद्यार्थी व नागरिकांची वर्दळ असते. मात्र, रस्ता अत्यंत निकृष्ट अवस्थेत असून येथे मोठे खड्डे पडले आहेत. या चौकातील मोठ्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यातच रस्त्यालगत बसणाऱ्या भाजी विक्रेत्यांमुळे वाहतूक कोंडी होऊन अपघाताचा धोका कैक पटीने वाढला आहे. या मार्गावरही जागोजागी मोठमोठे खड्डे पडल्याने दुचाकीस्वारांना आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोरील रस्ता तसेच सेंट झेविअर स्कूल परिसरातील रस्ते देखील खड्ड्यांनी व्यापले असून संबंधित प्रशासकीय यंत्रणेचे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे स्पष्ट होत आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे, या प्रशासनाच्या या सुस्त कारभारामुळे भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी श्रीरामपूर नगरपालिका प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांवर राहील, असा कडक इशाराही यावेळी देण्यात आला आहेत.

शहरातील हे जीवघेणे खड्डे लवकरात लवकर बुजवून रस्ते वाहतुकीसाठी पूर्णपणे सुरक्षित करावेत, अशी एकमुखी मागणी त्रस्त नागरिकांमधून केली जात आहे.

# मेंढरं चारणारी पोरं झाली फौजदार!

### जुळ्या हंडाळ बंधूंची प्रेरणादायी संघर्षगाथा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : दारिद्र्य, उपेक्षा आणि संघर्षाची वाट तुडवत जिद्द, कष्ट व शिक्षणाच्या जोरावर यशाचे शिखर गाठणाऱ्या राहुरी तालुक्यातील वावरथ येथील जुळ्या हंडाळ बंधूंची यशोगाथा आज अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. मेंढपाळ कुटुंबात जन्मलेल्या चांगदेव बबन हंडाळ आणि आप्पासाहेब बबन हंडाळ यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करत पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पद मिळवून आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार केले आहे. विशेष म्हणजे ६ ऑगस्ट हा दोघांचा जन्मदिवस असल्याने त्यांच्या संघर्षमय प्रवासाची सर्वत्र चर्चा होत आहे.

मुळा धरणामुळे वडिलोपार्जित जमीन पाण्याखाली गेल्यानंतर हंडाळ कुटुंबाने मेंढपाळ व्यवसाय स्वीकारला. उदरनिर्वाहासाठी विविध ठिकाणी भटकंती करत हे कुटुंब कर्जत तालुक्यातील रुईगव्हाण येथे स्थायिक झाले. मोठ्या दोन भावांनी स्वतःचे शिक्षण अर्धवट सोडून मजुरी करत धाकट्या जुळ्या भावांच्या शिक्षणाला हातभार लावला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत चांगदेव आणि आप्पासाहेब यांनी शिक्षण घेतले. अंगावर पुरेसे कपडे नाहीत, पायात चप्पल नाही, खताच्या गोणीचे दप्तर आणि दररोज २२ किलोमीटरचा प्रवास अशी त्यांची दिनचर्या होती.

एसटीचा पास परवडत नसल्याने मोडकळीस आलेली सायकल विकत घेऊन त्याच सायकलवर दुसऱ्या विद्यार्थ्याला शाळेत ने-आण करत खर्च भागवला. मात्र अभ्यासातील सातत्य आणि गुणवत्तेत त्यांनी कधीही तडजोड केली नाही. जमिनीच्या वादातून अन्याय, दादागिरी आणि कोर्ट-कचेऱ्यांचा अनुभव घेत असताना वडील बबन हंडाळ यांचे एकच स्वप्न होते, माझी दोन्ही पोरं फौजदार झाली पाहिजेत.

हेच वाक्य दोघांच्या आयुष्याचा ध्यास बनले. श्रीगोंदा तालुक्यातील कोकणगाव येथे अतिक्रमणाच्या कारणावरून घर पाडण्यात आल्यानंतर फौजदार आमच्या ओळखीचा आहे असे ऐकावे लागले आणि त्याच क्षणी दोघांनी पोलीस अधिकारी होण्याचा निर्धार केला. आर्थिक अडचणींमुळे मोठ्या शहरात क्लास न लावता त्यांनी स्वतःच्या अभ्यासावर भर दिला. जंगलात धावपट्टी तयार करून, झाडांच्या फांद्यांवर पुल-अप्सची साधने उभारून त्यांनी शारीरिक तयारी केली. अखेर २०१६ मध्ये पोलीस खात्यात निवड झाली. त्यानंतर विभागीय परीक्षेत दोघेही पोलीस उपनिरीक्षक झाले. आप्पासाहेब हंडाळ यांनी एमपीएससी परीक्षेत राज्यात २२ वा क्रमांक मिळवत विशेष गुणवत्ता सिद्ध केली.

सध्या आप्पासाहेब हंडाळ हे श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात, तर चांगदेव हंडाळ हे पारनेर पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. मेंढरं चारणाऱ्या दोन जुळ्या भावांनी संघर्षावर मात करून मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील युवकांसाठी प्रेरणेचा दीप ठरत असून, जिद्द आणि मेहनतीपुढे कोणतीही परिस्थिती मोठी नसते, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे.

## एकाच रात्रीत तीन दुकाने फोडली

### लोणीतील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे सावट




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील लोणी खुर्द येथील आशीर्वादनगर परिसरात मध्यरात्री चोरट्यांनी धाडसी कारवाई करत सलग तीन दुकाने फोडल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अवघ्या काही मिनिटांत इंडियन पोल्ट्री फॉर्म, भारत ग्रो आणि साई माऊली किराणा या दुकानांचे शटर उचकटून चोरट्यांनी आत प्रवेश केला आणि रोख रकमेवर हात साफ केला. एकाच रात्री सलग तीन दुकाने लक्ष्य केल्याने परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, ही घटना रात्री सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास घडली. चोरट्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने दुकाने फोडून चोरी केली. चोरीनंतर ते पसार झाले; मात्र त्यांची हालचाल परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाली आहे. त्यामुळे तपासाला महत्त्वाचा धागा मिळाल्याचे सांगितले जात आहे. घटनेची माहिती मिळताच लोणी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून संशयितांचा शोध सुरू केला आहे. चोरीला गेलेल्या रोख रकमेचा व इतर ऐवजाचा नेमका तपशील तपासानंतर स्पष्ट होणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, अलीकडच्या काळात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे व्यापाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली असून रात्रीची पोलीस गस्त वाढवून चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी व्यापारी आणि नागरिकांकडून होत आहे. एकाच रात्री तीन दुकाने फोडण्याच्या घटनेने लोणी परिसरातील कायदा-सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.